# मंजुभारती

(जीवनपर कवितासंग्रह - भाग ४)

रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)

मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**मंजुभारती** (जीवनपर कवितासंग्रह - भाग ४)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : dr.manjushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२,
कवितांच्या बागेसमोर, ज्योतीनगर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस,
वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : चैत्र कृ. १३, शके १९४६,
सोमवार, दि. ६ मे, २०२४

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, १-एन, सेक्टर ए, एन-१,
सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
भ्रमणध्वनी - ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-972636-8-2

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : ₹ २००/-

# समर्पण



जीवनाचा अर्थ समजावून सांगताना
जीवनाला अर्थ देणाऱ्या माझ्या सर्व गुरुजनांना
हा जीवनपर कवितासंग्रह
सदार सविनय
समर्पित

# मनोगत

जन्म व मृत्यूच्या मधल्या कालावधीला जीवन म्हणतात. हा कालावधी अनिश्चित असतो. माणसे श्वास घेतात हे खरे पण जगतात का? हा प्रश्नच असतो. मुळात जीवनाकडे पाहण्याचा प्रत्येकाचा दृष्टिकोन अतिशय वेगवेगळा असतो अथवा कधी कधी तर जीवनाकडे पाहण्याची दृष्टीच विकसित झालेली नसते.

कविमनाने जगण्याच्या प्रत्येक पैलूवर मन विसावते तेव्हा जीवनपर कविता उतरत जातात. हा दृष्टिकोन जरी कवयित्री म्हणून माझा असला तरी तो रसिकहृदयाचा ठाव घेणारा असल्याने त्याचेच जीवन उलगडवणारा ठरतो.

जीवन म्हणजे तर सोपे, म्हटले तर अवघड, केवळ त्याला जगताना मनात एक उमेद जिवंत हवी, कुणाचा स्नेह, कुणाचे वात्सल्य, कुणाची ओढ हृदयात हवी. भोवतालच्या प्रत्येक बाबीत जीवन जर गवसू लागले तर मग त्याचा नव्याने शोध घेण्याची गरजच पडत नाही.

रसिकांना या जीवनपर कविता जीवनासाठी हव्या हव्याशा वाटतील, तरच या सफल होतील.

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# अनुक्रमणिका


१) एक गालिचा विणला जाईल ... ७
२) जणू आरसा हा खड्डा ... ८
३) चांगलं वागणं हे नक्कीच फळंल ... ९
४) आतल्या बागेत सुंदर फूल... १०
५) बघू जमतंय का आपल्याला... ... ११
६) शब्द ... १२
७) आज चिरा जो मढवीन येथे ... १३
८) शाश्वत इथले आहे का हे ... १४
९) एक पीस ... १५
१०) थकलेले किती प्रश्न सुटावे ... १६
११) कुठला शिक्षक असेल तो की ... १७
१२) एक प्रेम प्रश्नांचे उत्तर ... १८
१३) जीवन सुंदर आणि कलंदर... १९
१४) उडू या आशेवरती ... २०
१५) कलात्मिका तू मधूराकृती ... २१
१६) कविता माझी ... २२
१७) दूर दूरवर वाट एकली ... २३
१८) मनास नव्याने विसळावं ... २४
१९) आत्मा जाणे प्रीती स्पंदन ... २५
२०) स्वप्नील असावे ... २६
२१) प्रतिभा प्रतिमा राज्यस्तरीय स्पर्धेसाठी रचना ... २७
२२) रडते माझ्यासाठी ... २८
२३) सांभाळीन शब्दा खरे ... २९
२४) वय चालले निघून ... ३०
२५) तुला लेकरात पहावं ... ३१
२६) रोज घेतो श्वास त्याची देण आहे ... ३२
२७) आजोबाला तुझ्यामध्ये उरायचं जरा ... ३३
२८) नवीन वर्ष नवी सकाळ ... ३४
२९) फिरावा मोऽऽर पिसारा ... ३५
३०) उमेद ... ३६
३१) मधुमित जीवनराणी आली... ३७
३२) होऊन धुके पहा... ... ३८
३३) असेल मी की नसेल मी ... ३९
३४) रंग रंग त्याचाच ... ४०
३५) उमलून रोज यावे ... ४१
३६) एक गाव असतो ना ... ४२
३७) पुढच्या क्षणाला होईल काय ... ४३
३८) मनी हळवा पाऊस ... ४४
३९) तिथे चंदनी भाव उरे ... ४५
४०) सांगा बरे दिव्यांनो ... ४६
४१) गझल ... ४७
४२) जाणता रंगास त्याच्या ... ४८
४३) त्या अंधारातून जागते ... ४९

४४) चला रंगू या निज रंगातून ... ५०
४५) रास रंगून हसे श्रीरंग ... ५१
४६) निज खुशीत रमावे ... ५२
४७) पोट नको दे माणसा ... ५३
४८) खरंय ना ग पत्रपेटी ! ... ५४
४९) साद घुमते अंतरी ... ५६
५०) फुलून सार्थक वाटावं ... ५७
५१) रंग आपुले स्वच्छंद कलंदर... ५८
५२) तरी रोज चित्र न्यारे ... ५९
५३) हिरवा उत्साह सांडला ... ६०
५४) आयुष्य रम्य रमले ... ६१
५५) वय हे खुणावे सदाच नंतर... ६२
५६) उरल्या खुणा उराशी ... ६३
५७) दरवळू द्यावा मनातून मरवा... ६४
५८) जणु भाव हे अव्यक्त ... ६५
५९) आठवणींच्या पिंपळगाठी ... ६६
६०) शेतकरी हा राजा व्हावा... ६७
६१) अमृत मिसळो जळीही ... ६८
६२) मनाचा मोर भावविभोर ... ६९
६३) मनाचे द्वंद्व ... ७०
६४) भेट अर्थ देते ... ७१
६५) त्या हृदयाने हे हृदयही चिंब... ७२
६६) रोज नव्याने पुन्हा उगवणे ... ७३
६७) चालण्यातसे वेगळी गोडी ... ७४
६८) बदले जनांचे बघणेही ... ७५
६९) सुख मनमंदिरात ... ७६
७०) इतुके सुंदर सुमन जयाचे ... ७७
७१) वात्सल्याचे पहा सोहळे... ७८
७२) नातं अस्संच असावं ... ७९
७३) नव्याने मी उगवेन ... ८०
७४) या खुलेपणाने क्षणांनो ... ८१
७५) फजिती ... ८२
७६) देशी पदरी शिदोरी ... ८३
७७) तृप्त अंतरीचे डोळे ... ८४
७८) असा वारसा
परिमळांचा धरू या ... ८५
७९) रंगरंगुल्या भाव छटा ... ८६
८०) मी संगे नेईन सत्त्व रे ... ८७
८१) आईपण मी भोगावे ... ८८
८२) कसे सांगू रे धुक्या सख्या... ८९
८३) दाणा दाणा श्वास चालवी ... ९०
८४) रोज पथिक मी नवा नवा ... ९१
८५) चोचीतले गाणे गाई ... ९२
८६) पैलतीरावर गर्दी नाही ... ९३
८७) मैतरीण भरतीया
जीवाची पोकळी ... ९४
८८) रोज सांजेला गगनी चाले ... ९५
८९) हरवला आज कुठेतरी गाव... ९६
९०) पाचू सुरावळ उमटून जावी... ९७
९१) हृदय केवढे श्रीमंत ... ९८
९२) अवघड ना जीवनाची वाट... ९९
९३) जीव जडविणे व्यर्थ ... १००
९४) धाम साऱ्यांचे शेवटी ... १०१
९५) एक साधं झाड
कधी होऊ देत ... १०२



## (१)
## एक गालिचा विणला जाईल

उद्याला कोण पुसतो इथे
जगणे आजचे मस्त खरे
क्षणक्षण काळ सरकताना
या क्षणालाच जगणे बरे

गेला की तो होतो अतीत
वेध उद्याचा व्यर्थ व्यतीत
कशास चिंता उगा कालची
कशास भविष्य चिंता उगीच

आज मिळवणे आज भोगणे
आजच वास्तव निज स्वीकारणे
आज श्वास हा मालकीचा अन्
आजच सारे सुगंध भरणे

कुढुनी जाते काया खंगून
मनही नीरस उगा विरंगून
म्हणून आजच्या सरीत भिजणे
आज चांदणे द्यावे पेरून

क्षण क्षण सुंदर जगलो जर का
एक गालिचा विणला जाईल
नक्षी नक्षी आज आजची
उद्या भेटता रमून जाईल

दि. १४/०७/२०२३
सकाळी ०७.२३ वा.



## (२)
## जणू आरसा हा खड्डा

ज्याची  सदा उपेक्षा
खड्डा पहा सुखावे
त्या साचल्या जळात
देखावे रेखवावे

कसे कोणाचे फळावे
कधी कशाने हे भाग्य
नसे माहीत गणित
ज्याचे त्याचे हो सौभाग्य

हिणवून ज्याचा होतो
दुस्वास सदोदित
कधी वाटते का त्याचे
लावण्यही हो उदित

जणू आरसा हा खड्डा
रंगाळलेल्या नभाचा
तरुबिंब देखणे हे
बनवून घ्यावा साचा

रस्ता सुरेखचि झाला
जणू रत्न जडवावे
पाहण्या जरा विसावा
अवचित स्वप्न व्हावे

दि. १६/०७/२०२३
रात्री १०.०२ वा.




(३)

**चांगलं वागणं हे नक्कीच फळंल**

कुठं कोसळतो जीवघेणा अन्
कुठं पाण्याची दैना
पाऊस झाला दगेखोर की
माणूस नीटच ऱ्हाईना

झाडं खाऊन गिळून गेला
झरे पाट नि नद्या
आज मिळावं सुख गोणीभर
नासून देतो उद्या

पोखर पोखर डोंगुर पाडुनी
घरटं आपलं थाटून
हवा ऊन अन् समदी संपदा
आपसात घेतो वाटून

खुडणं तोडणं पाडणं कापणं
एवढंच करतोया गडी
जोडणं सांधणं मना बांधणं
गमवून बसतोया घडी

निसर्ग हाय जो खरा दोस्त ह्यो
त्याच्या मुळावर उठतोय
ढेक्यात चालतोय गर्वात वागतोय
त्यो बी बिघडला की कुटतोय

म्हणून म्हणते सांभाळ करावा
पोटच्या लेकरागत त्याचा
निसर्ग हासंल कुशीत बसंल
सुखाचा सापडंल साचा

माया लावली तर माया मिळंल
रोपटं लावलं तर छाया मिळंल
जे जे देता येईल ते द्यावं
चांगलं वागणं हे नक्कीच फळंल

दि. २१/०७/२०२३
रात्री १०.३९ वा.



काळजाची एक एक परत
अलगद उलगडू लागते
आतल्या खऱ्याखुऱ्या भावनांची
परागकणी खुलून येते

मग काय सुगंधाच्या
भांडारांचे सांगावे
आत गंध बाहेर दरवळ
दिव्यत्वाला हुंगावे

रोज फुलून येते एक
आतल्या बागेत सुंदर फूल
हसून त्याचे स्वागत करता
आत्म्यालाही पडते भूल

दि. २२/०७/२०२३
सकाळी ०८.४८ वा.

## (४)
## आतल्या बागेत सुंदर फूल

मनातून उमललेल्या
हास्याच्या पाकळ्या
फुले होऊन जातात
पटकन आनंदाच्या कळ्या

रंग कोणते म्हणून
काय विचारता तुम्ही?
सारे रंग आनंदाला
आपलेच की नाही?



(५)

**बघू जमतंय का आपल्याला...**

कधी कधी वाटतं मनाच्या कमानी
अशाच असतील का?
एकात एक, आत आत उलगडत
जाणाऱ्या
वरवर मोहक सुंदर चिरे पण सघन खोल
गहन होणाऱ्या

कसा लावावा थांगपत्ता कोणीतरी
कुणाच्या तरी मनाचा
वरवरच्या परती इतक्या मोहवत जातात
की आत आतले सौंदर्य बघायचेच राहून
जाते अशा कमानीसारखे

बरं प्रत्येक कमानीचे आधारस्तंभ इतके
गुरफटवून टाकणारे की
तिथेच घुटमळतो रेंगाळतो प्रत्येकजण
आपले आपले म्हणून सारे कवटाळीत

नक्षी मनाच्या भावनांची इतकी सालस
सुकुमार सुकोमल नि सुरस की
क्षणोक्षणी अडकून पडतो आपण त्याच
भावनांच्या जटिल गुंत्यात
मग नेमकी नक्षी ही कुठून सुरू झाली
हेही कळत नाही
कुठे ती संपणार हेही लक्षात येत नाही

पुन्हा सारखेच वाटते ते सगळे चित्र, ते
रंग, ते आकार, त्या कलाकुसरी
काही खुणा दडलेल्या असतात तरीही
काळाच्या उदरात
आपल्याही नकळत, कुणाच्या तरी
सर्वकळत
त्या कलाकाराचा वेध ज्याला घेता
आला त्याच्या या सतराशे साठ कमानी
आपसुक सुटतात एकच होतो मग
गाभारा
तोही आणि आपणही
बघू जमतंय का आपल्याला....

दि. ०६/०८/२०२३
रात्री ०८.४० वा.

## (६)
## शब्द

शब्द सुंदराचा घनु
शब्दे प्रकटीला मनु
शब्द ब्रह्म अनुरेणू
शब्द जाणताना

शब्द डोह खोल खोल
शब्द अनमोल मोल
शब्द अर्थ तोल तोल
शब्द बोलताना

शब्द सखा जीवनाचा
शब्द आलेख मनाचा
शब्द शारदी धनाचा
शब्द मानताना

शब्द वीणेचा झंकार
शब्द मूक हो हुंकार
शब्द वाणी अलंकार
शब्द छेडताना

शब्द अर्थ भाव नाव
शब्द आर्त एक गाव
शब्द काळजाचा ठाव
शब्द जागताना

दि. ०७/०८/२०२३
रात्री ११.२३ वा.



## (७)
## आज चिरा जो मढवीन येथे

वणवण इथली रोजरोजची
कष्टा विना ही भाकर नाही
वय चालले करपून तरीही
कोंब मनातून फुलती काही

उचलून घेता डोईवरती
दगडविटांचा भार पसारा
मधेच दिसते मोरपिसासम
स्वप्नं मनातील घेत फुलोरा

डोळ्यामधले भाव देखणे
वाचून घेईल कधी कुणी का
आज जरी हा गढला मातीत
उद्या कोंब उगवेल कुणी का

दिसतील कोणा चिंता माझ्या
कळतील कोणा आशा सुंदर
चूल पेटवून खळगी भरता
मनात लाटा उठती कलंदर

आज चिरा जो मढवीन येथे
असेच घरकुल माझे असणे
गोड एक ही आस उरातून
दिवसाढवळ्या रोज पाहणे

दि. २३/०८/२०२३
सकाळी ०९.१३ वा.



## (८)
## शाश्वत इथले आहे का हे

अथांगता ही हिरवी निळसर
लुभवी मनास किती दिलासा
उंच नभातून वाकून पाहे
धरतीवरती रंगीत आशा

होडी काठावरती उभी ही
जाणे वल्हव हाती आहे
गगनामध्ये माळ खगांची
आनंदाने गाती आहे

उभ्या ठाकल्या तरुवर तनुवर
एकही जरी नसे पर्णिका
जगण्यासाठी मुळामुळातून
शोषून घेतो जीवनरसिका

शाश्वत इथले आहे का हे
की सारे जणु नश्वर असते
मेघमालेतील आकारांचे
नकाश रेखे काही नसते

कधी उन्हांची तिरीप सोनेरी
कधी भरले आभाळ पेलणे
कधी सुखाची झाल पांघरून
कधी दुःखाचा जाळ झेलणे

दि. २६/०८/२०२३
सायं. ०६.२६ वा.



## (९)
## एक पीस

बालपणीचा मोहक छंद
एक पीस जे पेटीबंद
अजूनही आठवते मला
पकडण्यात मी होते धुंद

किती हळुवार ते उडत यायचे
वाऱ्याशी जणु झुलत रहायचे
त्याच्या मागे मागे पळता
घरापासुनी दूर जायचे

देऊन हुलकावणी उडे ते
अलगद गवतावरी पडे ते
किती मऊ रेशमी स्पर्श तो
आजही माझ्या जवळ गडे ते

गालावरती सहज रुळे अन्
गुंतून त्याच्यावरून फिरे मन
कधी एकटे वाटे जर का
हळूच हाती धरते मी क्षण

करेल कोणी किंमत कैशी
अमूल्य ठेव ही हृदयी जैसी
आजही जपते आहे मी ही
पीस आठवण रेशीम तैशी

दि. २७/०८/२०२३
रात्री ०७.५३ वा.



## (१०)
## थकलेले किती प्रश्न सुटावे

अथांग जीवन सागर असता
असेच ठाकून उभे राहते
प्रश्न चिन्ह हे मधेच मोठे
तरी आयुष्य हे पुन्हा वाहते

त्याच्या पुढती नमलो जर का
अजून मोठे मोठे वाटते
पदोपदी मग रूप निराळे
लेऊन वेडे पुन्हा भेटते

धडकी कशाला भरू द्यायची
त्याची भूमिका समजून घ्यावी
उत्तर शोधीत असेल तेही
म्हणून भेट ही आपुली घडावी

उभे ठाकणे निर्धाराने
खळखळ वेगे लाटा उठता
तेही निरुत्तर क्षणात होईल
विश्वासाचे धागे पटता

जरा विसावा त्याला द्यावा
थकलेले किती प्रश्न सुटावे
वाऱ्यावरती उत्तरगंध
दरवळणारे मग भेटावे

दि. २८/०८/२०२३
रात्री १०.३० वा.



## (११)
## कुठला शिक्षक असेल तो की

कुठला शिक्षक असेल तो की
जो पक्ष्यांना उडान देई
घरट्यामधुनी आभाळाला
जो मोजण्याची मुदान देई

कुठला शिक्षक असेल तो की
बीजा सांगे अंकुरण्याला
जिथे उन्हाचे तोंड दिसावे
तिथेच तगवून तरारण्याला

कुठला शिक्षक असेल तो की
पुष्प कळीचे उमलून येई
कसे कोणत्या वेळी खुलावे
रंग आकारा कैसे येई

कुठला शिक्षक असेल तो की
झऱ्या झऱ्याला वाहणे देई
नदी सागरा कशी शोधते
कुठून खाली धबधबाही येई

कुठला शिक्षक असेल तो की
चराचराला कळणे शिकवी
कुठली शाळा कसले पुस्तक
कसे तो सगळ्यां वळणे शिकवी

कुठला शिक्षक असेल तो की
मनी जीवनी अढळ असा
देण्यासाठी सदा सज्ज अन
हात तयाचा सढळ असा

दि. ०५/०९/२०२३
रात्री ०९.३७ वा.




## (१२)
## एक प्रेम प्रश्नांचे उत्तर

कोण बरोबर कोण हा चूक
प्रत्येकाला कसली ही भूक
उगा सांडणे आयुष्याला
उत्तर उभे असताना मूक

उगा व्यर्थची भांडण तंटे
अडवाअडवी वाकड खुंटे
अर्थाअर्थी संबंधही ना
तरीही जोराची मग जुंपे

कुणी मागायची आधी ही क्षमा
कुणाला कुणाचीच ना तमा
मी ना घेईन जरी माघार ही
रुबाब माझा तरी माना

आधी असायचे प्रायश्चित्त
मना तनाला औषध कित्त
आता माझे तेच बरोबर
गढूळलेलं करडं चित्त

कशी व्हावी मग सुटका यातून
कुणी बोलते ऐका आतून
प्रेम करावे नितांत सुंदर
प्राणामध्ये प्राण हे ओतून

एक प्रेम प्रश्नांचे उत्तर
नाते टिकवू... जरी फाटे सत्तर
त्यागाने नको रागाने
झुकणे पडले तरी बेहत्तर

दि. ०८/०९/२०२३
सकाळी ०९.१७ वा.



(१३)
## जीवन सुंदर आणि कलंदर

चला जरासे फिरून येऊ
अशा रम्य वाटेवर
सुंदर स्मृती साठवून घेऊ
पुन्हा पुन्हा वरचेवर

कशास वळते वाट मुरडते
अजून देखणी होते
कधी डावीकडे कधी उजवीकडे
रम्य रेखणी होते

तिच्या कडांना फुलाफुलांची
सजलेली ही किनार
काठपदरी जणू नेसून दिसते
साजिरी नाजूक नार

उंच चिनारी तरूवर सुंदर
आकाशी झोंबती
चंद्र सूर्य की तारे वेडे
नभांगणी लोंबती

प्रकाश आभा पसरे हलकी
गगन उजळते जसे
अवनी वरती सोनशलाका
पसरे चित्र सुरेखसे

जरा क्षणाची उसंत मिळता
मन सहजी वळते
जीवन सुंदर आणि कलंदर
इथे येता कळते

दि. १३/०९/२०२३
सकाळी ०८.५९ वा.



## (१४)
## उडू या आशेवरती

कधी लाटेच्या या फेना परी
जरा जगावे वाटे
जरी माहीत की असणे क्षुल्लक
तरी उडावे वाटे

जशी माळ ही मुक्त खगांची
लाटांवरूनी उधळते
क्षण सुंदरसे असेच पिरूनी
जीवनलाट उसळते

असो क्षणाचे फेसापरी ते
स्वतःस फुलवून देणे
असो की अथवा पंख पसरूनी
हवेत उडवून नेणे

जिरेल फेनक जरी लगेचच
फेसाळण्याची मजा
जरी नसेल ही उडान कायम
भीती होतसे वजा

पुन्हा पुन्हा ती लाट धावते
नव्याच जल्लोषाने
पुन्हा पुन्हा हे पक्षी गगनी
त्वेष नि उन्मेषाने

चला मिटावे तरी लिहावे
स्वतःच वाळूवरती
बिन पंखांचे जरा मोकळे
उडू या आशेवरती

दि. १८/०९/२०२३
रात्री ११.०१ वा.



## (१५)
## कलात्मिका तू मधुराकृती

सौंदर्याची परिकल्पना ही
किती पुरानी न सांगता ये
भारतीयांची समृद्धी
कलेतली ना मोजता ये

कधी काळची सुंदर युवती
शृंगाराची जणू मूर्ती
किती शतकांचा लोटून काळ
तरी देत राहते अनंत स्फूर्ती

उचलुनी घेते पदकमलाला
बांधण्यास ती पैंजनाला
रुळती आजही किती घुंगरू
रसिकजनांच्या प्रीत मनाला

दर्पण दाखवी तुला सेविका
मदनमनांची तू ग मल्लिका
बिंब कल्पितो एक एकजण
प्रतिबिंबाची तूच स्फुल्लिका

आखीव रेखीव तुझी आकृती
तू निर्माती की स्वयं निर्मिती
कृती म्हणू की दिव्य संस्कृती
कलात्मिका तू मधुराकृती

दि. ३०/०९/२०२३
रात्री ११.५९ वा.



## (१६)
## कविता माझी

दव ओघळले शब्द शब्द ते कविता माझी
मोती गळले माळेमधले मौक्तिक होते कविता माझी

आकाशाशी नाते आणिक क्षणात सुंदर स्वर्गही जगते
भूमीवरती राहूनही जी दिव्य अर्थ स्वतःमधे वाहते
शब्दांची लडिवाळ प्रीत... कविता माझी

पक्षी होते नभात उडते गवतफुलांशी बोलून जाते
जळी स्थळी फूल नि कळी काव्यवेलीवर डोलून जाते
हसते खिदळते... कविता माझी

अलगद बिलगून जाते वेडी, कधी आसवे ढाळीत जाते
कधी खुशीच्या लडी मोगरी, अर्थामध्ये गाळीत जाते
रसिकांची लाडा कोडाची... कविता माझी ...

मी जगते रोज रोज जी ती कविता माझी
हृदयपाकळीवरती भावना कोरत जाते कविता माझी
श्वास घेते तर कविता येते, निःश्वासातून गंधित होते... कविता माझी

मी ती नाही वेगळी, सखी सोबती कविता माझी
ती मन माझे मीही तिचे, अशी एकरूप कविता माझी
ओळख एकदुजीची ऐशी, अलवार होतो अशी कविता माझी
कविता माझी...
कविता माझी...

दि. ०१/१०/२०२३
रात्री ११.२७ वा.
राष्ट्रीय कविता दिन



## (१७)
## दूर दूरवर वाट एकली

कधी कुणी कोणा भेटावे
असते का ठरलेले
किती निरुत्तरीतसे प्रश्न हे
गाठीशी उरलेले

मनात असता भेट नसे पण
अवचित कोणी उभे ठाकते
उंबऱ्यातली व्यक्ती अतिथी
आपुलकीचे नाते राखते

किती क्षणांचा असे सहवास नि
किती भावना गुंतून जाती
उगा अडकले कितीक धागे
खोल मनातुन खुंतून राहती

नसते आपुले खरेच कोणी
जगरहाटीची चाके फिरती
संपून जाता अंक एक मग
घ्यावी लागते स्वतःच गिरकी

दूर दूरवर वाट एकली
एकटीच ती मुकी धाकली
विचार करूनी पुन्हा पुन्हा ही
पडवी मनाची असे वाकली

दि. ०३/१०/२०२३
रात्री ११.२१ वा.



## (१८)
## मनास नव्याने विसळावं

कसं मिसळून जातं हे धुकाळलेलं आभाळ
साऱ्या हिरव्यागार वनात, झाडा, पानापानात
कोण कुणासारखं दिसतं हे नसतं महत्त्वाचं
महत्वाचं तर हे असतं की ते सरमिसळतात कणाकणात

त्यासाठी लागते स्वतःचं असं वाटणारं
अस्तित्व सहज सोडण्याची तयारी
इतरांच्या अस्तित्वात अलगद
राजीखुषीने मिसळण्याची कामना अपारी

तिथे विचार नसतोच करायचा काय
बदलेल काय टिकेल काय बरं आपलं असेल
झोकून द्यायचं असतं मनापासून आपले
रंग रूप आकार सोडत जे चित्र दिसेल ते दिसेल

राहतात न काही खुणा मूळच्या जशाच्या
तशा की काही नव्याने चिकटतात
काही रंग इतके गडद होतात की काही
अगदीच फिकटतात

तरी असं मिसळावं, सारं सारं घुसळावं
खालचं वर वरचं खाली एकदातरी उसळावं
बंध तुटतात, कळ्या मिटतात असं न मानता
असं समजून घ्यावं की नव्या पहाटेला
मनास नव्याने विसळावं

दि. ०४/१०/२०२३
सकाळी ०९.०८ वा.



## (१९)
## आत्मा जाणे प्रीती स्पंदन

वाट पाहणं नसतं केवळ
माणसाची भावना
मूक जनावर असले तरीही
प्रेम वसते त्या मना

डोळे धुंडाळती सारखे
सखा सोबती जरी दूरवर
क्षणाक्षणाला भास तयाचा
वाट पाहतो जीव अनावर

उगवे दिस की तो मावळतो
वाट तयाची सुनी रिकामी
काय चालते काळजात त्या
जीव जडविला पक्का ही हमी

कसे सांगावे शब्दच नसती
वाणी नसता नयन बोलती
ढाळून अश्रू अगणित रडतो
हावभाव ज्यांना हो कळती

कधी भेट होईल रे देवा
कसे जगावे मुक्या जीवाने
भेटताच मग हवा तो सखा
उसळून यावे तना मनाने

नाती असती आंतरिक ही
नच देहाचे कसले बंधन
काया असू दे जरी कोणती
आत्मा जाणे प्रीती स्पंदन

दि. १०/१०/२०२३
सकाळी ०९.२३ वा.

## (२०)
## स्वप्नील असावे

कधी कधी मन बुडून जाते
सुंदर स्वप्नी रमून जाते
ते खोटे की खरे मनाला
तेव्हा सत्यची पटून जाते

विश्व वेगळे सुंदरतेचे
हवे हवे ते अनुभवण्याचे
जे ना मिळते खऱ्या जीवनी
ते ते तेथून भागवण्याचे

कधी चिंतीले खोल मनातून
कधी न पाहिले कुठेच आतून
तरी कोठुनी उभे राहते
स्वप्नं मनाला पुरते व्यापुन

कधी भेडवी उगा व्यर्थ ते
कधी न कळती गूढ अर्थ ते
कुणी सांगावे कुठली दुनिया
कसली पात्रे कसे गर्त ते

तरी उराशी एक तरी मग
बाळगून स्वप्नास असावे
एक जादुई दुनिया आपुली
तिकडे सारे... स्वप्नील असावे

दि. १०/०९/२०२३
रात्री ११.३४ वा.



(२१)

**प्रतिभा प्रतिमा राज्यस्तरीय स्पर्धेसाठी रचना**

## गूढ तयाचे निर्माणही अन्

नव्या जीवाच्या ओढीसाठी
काडी काडी कापूस झाडी
जीव गुंतवून ठेवत आधी
घरट्यामधली मखमल माडी

खटाटोप चालला तियेचा
माय माऊली घडते आहे
पिल्लू जन्मा येण्या आधी
जन्म आईचा होतो आहे

देह असू दे भेद कोणता
मायपणाला छेद कोणता
वात्सल्याची ओटी भरतो
देव ओळखा त्यात जाणता

आत नव्या कोंबाची कुजबुज
माय साधते आतून हितगुज
अतूट नाते त्या दोघांचे
कुणा न कळते ऐसे अलगुज

गूढ तयाचे निर्माणही अन्
गूढ तयाची भट्टी चालते
आत जन्मला अंकुर नकळत
त्याची याची गट्टी बोलते

दि. ०९/०७/२०२३
सकाळी ११.५०



## (२२)
## रडते माझ्यासाठी

कधी उगा का भरून येते
नभ काळ्या मेघांनी
जलधारावत अश्रू ढळती
गुपचूप मूक क्षणांनी

सुटतो वारा वेडापिसा की
आठवणींचे वादळ
इकडून तिकडे ढगा ढकलती
दाट पटल कुठे पातळ

नको वाटते जीवास काही
जरी भरलेपण आत
उगा वाटते फोल ते सारे
सारे रिकामे हात

जरी बरसावे होत मोकळे
पुन्हा भरूनी येती
भूतकाळाच्या अनुभूती त्या
उमळुनी भरून जाती

विराण जागा विराण जीवन
विराण राहते मीही
किती वाहिले पाट आतले
उमलणे नाही तरीही

उगा घेरते अशी निराशा
घोर तमाच्या पाठी
कधीतरी मी राहते माझी
रडते माझ्यासाठी
केवळ रडते माझ्यासाठी

दि. ०६/०७/२०२३
दुपारी ०२.१४ वा.

## (२३)
## सांभाळीन शब्दा खरे

शब्दांचे गगनी पक्षी,
शब्दांचीच वहीवर नक्षी
शब्दच मारीती बाण,
अन् शब्द शब्द हा रक्षी

प्रतिभेचे लेऊन पंख,
विहरती ते उंचची उंच
कधी रंग केशरी पिवळा,
लाल निळा नि हिरवा कंच

कधी भाव ओढुनी घेती,
कधी मायेचा अंगरखा
कधी माणूस आपुला नसतो,
तसा शब्दही होतो परका

नवरसात डुंबून जातो,
कधी सूर वेणूचे गातो
कधी विराग उदासवाणा,
कधी हुरहूर बनूनी पहातो

कधी जन्मताच तो लाडिक,
मग कोड कौतुके वाढे
कधी जखम ताजी भळभळती,
कधी उगाच खपली काढे

तरी शब्द चालतो म्हणुनी,
मी जिवंत आहे सखया
तो मुखी थांबला जेव्हा,
इहलोक संपला तेव्हा

उडू द्यावी शब्दपाखरे,
क्षणी दुःख झणी हे विसरे
ती कमाल शब्दांचीच,
किमया शब्दांची घरे

सांभाळीन शब्दा खरे,
कवी शब्ददास रे
कवी शब्ददास रे...

दि. ०३/०६/२०२३
सायं. ०७.३३ वा.



## (२४)
## वय चालले निघून

कशासाठी खुंतायाचे,
उगा गुंती गुंतायाचे
सारे सोडणे इथेच
घ्यावे सहज जाणून
जगण्याला घ्या जगून
वय चालले निघून

कुणी देतो दगा पहा
कुणासाठी भार वहा
किती राबायचे आता
सारे आपुले मानून
जगण्याला घ्या जगून
वय चालले निघून

कुणी हिणवून बोले
कुणी वाकडेच चाले
किती मनावर घ्यावे
मन जाय करपून
जगण्याला घ्या जगून
वय चालले निघून

नावे ठेवीती हे जन
राखतो ना कोणी मन
किती एकटे कुढावे
रडताना धुमसून
जगण्याला घ्या जगून
वय चालले निघून

किती सुंदर आपण
पहा रूपसी दर्पण
एक द्यावे स्मित छान
दार मनाचे खोलून
जगण्याला घ्या जगून
वय चालले निघून

दि. ३०/०५/२०२३
रात्री १०.२९ वा.



**(२५)**

## तुला लेकरात पहावं

आस डोळ्यात ना सुकं
मूर्त थांबली उंबरी
एक झळाळता तारा
वात्सल्याच्या हो अंबरी

देह थकला वाटतो
तरी जीव ना थकला
वाटंकडं प्राण गोळा
दिस सांजी मावळला

झाली सांज आयुष्याची
ऐलतीर साथ सोडी
पैलतीरी कसं जाऊ
लेकरांची माया जोडी

कळो एकदा खुशाली
साऱ्या गणगोताची ही
डोळा भरून पाहू दे
सुखं नांदत्या घराची

वाडा गजबजू दे ना
पाखरांची चिवचिव
घास भाकरीचा देते
त्यात वतीन म्या जीव

भरल्या गोकुळात माझा
जीव अलगद जावा
गोतावळ्यात शेवट
जगण्याचा देवा व्हावा

असं एकटं जीवानं
कसं सांग ना रं ऱ्हावं
देवा माय म्या म्हणून
तुला लेकरात पहावं
मला तेवढं च ठावं

दि. १९/०५/२०२३
सकाळी ०८.५४ वा.

## (२६)
## रोज घेतो श्वास त्याची देण आहे

जीवनाची वाट झाली सोप्पीशी
सोडले मी सारे काही त्याच्याशी
एक सहजी मानले जे जे मिळाले
आहे ते ते नित्य माझ्या गाठीशी

जे न माझे का हवा मग अट्टहास
का मनाशी ती खुळी मग एक आस
सोडले मी सोडले सारे फुकाचे
जाणले की होत होते काही भास

माझे वाटे जेही मजला नाही माझे
त्यापुढे झुकुनी मी म्हटले सारे तुझे
आत आता शांत झाली वादळे अन
ते निमाले जे किनारे गाज गाजे

रोज घेतो श्वास त्याची देण आहे
तोच करतो जे ही काही ठाम आहे
भाग्य आणि कर्म दोन्ही आपुले ना
जाणण्याचे हेच की हो मर्म आहे

सोडले मी सारे त्याच्यावर आता
सारे सोपे होते नित्य त्यास ध्याता
सूर मजला सापडून आला सुरात
मोद आला हर्षुनी मी गीत गाता

दि. १२/०५/२०२३
रात्री १०.१५ वा.



(२७)

**आजोबाला तुझ्यामध्ये उरायचं जरा**

थकलेल्या हाताचं बळ राजा तू
जीवनाला जगण्याची आशाही तू
तुझ्यासाठी आजा बघ उमेदीनं उठला
वाऱ्यासारखा रानात धावत सुटला

गळाटलेल्या पायातलं झालायस त्राण
तू कुळाच्या येलीवरलं गोंडस पान
देवानं दिलेलं पदरात माझ्या
गोडगोड लावकं अनमोल दान

खांद्यावर तुला मी मिरवून जाईन
गावात शेतात मळ्यात नेईन
कमरेला करदोडा कपड्याचा खोडा
तुझ्यासाठी जमेल तसं मी गाईन

दिसंना डोळा... तुझ्या नजरेनं पाहीन
जीव झाला गोळा... तुझ्या रुपात राहीन
चिमणीचा घास, तुझ्या अंगाला सुवास
बाळकृष्ण तू, तुला प्रेमभक्ती वाहीन

अंगाला लिपटून राहतोस खरा
ऐक राजा आजोबा झाला म्हातारा
तुझ्यासोबतच सारं करायचं त्याला
आजोबाला तुझ्यामध्ये उरायचं जरा

दि. १०/०७/२०२३
सकाळी ०९.१२ वा.



## (२८)
## नवीन वर्ष नवी सकाळ

आज पहाट उगवून आली
सकाळ मागे मागे
कित्ती कित्ती मिरवून गेली
निशाही सारे जागे

पहिले पहिले जेही काही
मजाच वेगळी असते
पहिले प्रेम जसे काळजात
खोल रुतून बसते

सकाळ किती ताठ झाली
नवीन वर्ष आले
पक्ष्यांचेही कूजन मग
नव्या सुरात झाले

नव्या नव्या आकांक्षा अन
नवी स्वप्ने झाली
नवी उमेद हलकीशी
आतून जागी झाली

दरवेळी नवीन वर्ष
वेगळेच काही वाटे
वर्षाची सुरुवातही
सकाळ आगळी भेटे

तिचा जोर तिचा तोरा
असा साठवून घ्यावा
उरलेल्या दिवसांमध्ये
पुन्हा आठवून द्यावा

दि. ०१/०१/२०२३
सकाळी ०७.५१ वा.

## (२९)
## फिरावा मोऽऽर पिसारा

कुणाच्या आठवांनी हो
कुणाला दाटवे यावे
कुणाच्या स्पर्शकलिकांचे
मोहुनी ताटवे व्हावे

कुणाच्या आठवांनी मग
कपाळी रेघोट्या उठती
कुणाच्या तर स्मृती ऐशा
आठ्या भाळावर उमटती

कुणाच्या आठवांच्या धारा
नित बरसून जातात
कुणाच्या गोड सहवासी
जन्म हरखून जातात

कुणाच्या आठवांनी ते
पसरते गर्द धुके धूसर
कुणाच्या शब्द माधुरीत
दिलावर घडते कलाकुसर

कुणाच्या आठवांचे हे
विमोही गाठोडे मोठे
उघडता संपतच नाही
थांबणे होईल मग कोठे

कुणाच्या आठवांचे हे
अनामिक ओझे कोणाला
न जाते दूर अन् छळते
कोठडीत जाळते जीवाला

कुणाच्या आठवांचा हा
मनासी केवढा सहारा
आठवून आठवांना त्या
फिरावा मोऽऽर पिसारा

दि. ३०/१२/२०२२
सकाळी ०९.२१ वा.



(३०)

**उमेद**

उगवायची उमेद जर असेल ना
रुजवायची धमक असावी लागते
गाढुनी स्वतःस मृत्तिकेत अन्
कोठडी तमाची भोग लागते

श्वास कोंडतील गप्प राहणे
आतल्याच आत सारे साहणे
योग्य काळी कोंब अंकुरे ना मग
बीजाने नव्या रूपास वाहणे

असे घडून येती हो समर्पणे
स्फूर्ती अंतरात काही अर्पिणे
माझे माझे सारे सारे सोडणे
मग नवीन नवे काही जोडणे

नवनवीन पालवी न शाखा पल्लवित नव्या
रंग कोवळे हरित न रंग भरडे गडदुल्या
स्वागतास ते कधीही सज्ज असते नवनव्या
उमलुनी हळूच हसते मुचकुली कळी कळ्या

थांबणे पुन्हा जरा प्रतीक्षा उमलण्यास ती
साहणे अबोल त्यास संज्ञा तितीक्षा अशी
अंथरली संकटे भेदने कठीणशी
तरीही हासताच गाली सुमनकळी डोलली

दि. ०१/०१/२०२३
दुपारी ०१.२९ वा.



## (३१)
## मधुमित जीवनराणी आली

कधी घडतो हा प्रवास सुंदर
असा अकल्पित आणि कलंदर
मधेच सेतू कधी देखणा
उतावीळ धबधबा जलंधर

असा विसावा जीवनातही
जेव्हा जेव्हा मिळेल काही
क्षण सुंदरसे टिपता यावे
भरूनी हृदयांतरी तू पाही

हिरवी हिरवीगार झाडुली
कशी फिरवते क्षणी जादुली
हवा धुंद अन् सुगंध मंद हा
तरतरलेली हरेक पानुली

कुंद ओलसर श्वासासंगे
ओले होऊन जावे क्षणभर
नको कोरडे ठक्क राहणे
भावभावना ओल्या मणभर (मनभर)

देवा जुळू दे काही यात्रा
स्मृतीत त्यांच्या भरू दे जत्रा
पुलकित होऊन रोमांचही दे
विस्मय वाटू दे मज गात्रा

इतकी सुंदर सृष्टी दिधली
जगण्यासाठी प्रेरक झाली
सुरू राहू दे सदा निरंतर
मधुमित जीवनराणी आली

दि. ११/०१/२०२३
सकाळी ०९.२१ वा.



## (३२)
## होऊन धुके पहा...

अशा धुंदल्या वाटेवरती
वाट धुक्याची येते
अलगद पकडून हात मनाला
संगे घेऊन जाते

देख चंड मार्तंड थंड हा
अशीच किमया होते
कणखर रश्मी मृदुल होऊनी
दिनी चांदणे न्हाते

वाकून झाडे हुडहुडणारी
गुडुप्प पाने होती
खळखळणारा झरा तो वेडा
दिशा पुसटशा होती

हिरवाईवर चादर पसरे
रजत पांढरी चमचम
दवराणीचे मोती नाचती
नाद ऐकू ये छम् छम्

अंगावरती धुके पांघरून
बिलगून जावे स्वतः
एक धुकाळली सकाळ येता
होऊन धुके पहा...
रम्य वाटते अहा...

दि. २१/०१/२०२३
सकाळी १०.११ वा.



## (३३)
## असेल मी की नसेल मी

सुनसान आज का वाटे वाट ही
जशी एकटी एकटी
सुनी सुनी ही आज राहिली
माझी बिचारी राहुटी

या वाटेवर होते मेळे
एकेकाळी भरलेले
आज नाद हे पोकळ काही
उरात माझ्या उरलेले

गळून गळून थकून गेले
आसवं वेडे ओघळता
तरीही फुलली नाही माती
कितीही तिला मी नांगरता

सुकली झाडे पाने पिवळी
छाया भिवविती मज हृदया
कुणी ऐकुनी येईल का रे
साद मनाची येत दया

पाहीन डोळा भरून गोकुळा
मग हे जातील प्राण सुखे
बघा वाचता आले कोणा
नंतर जर हुंदके मुके

वाट वेगळी भकास होईल
सारे सारे तसेच तरीही
मी जाताना पुन्हा न येण्या
चटके सांजेला बसतील उरीही

काळरात्र ती होईल आणिक
पुन्हा सकाळी तुमचे जगणे
असेल मी की नसेल मी त्या
शब्दातूनही सुकून जाणे

दि. २१/०१/२०२३
सकाळी १०.५४ वा.



## (३४)
## रंग रंग त्याचाच

उन्हांनाही वाटत असेल
रंग जरा व्हावे
कधी हिरव्या निळ्या पिवळ्या
केशरात न्हावे

काय बरं एकच एक
रंग साऱ्या अंगा
सरमिसळ होऊन जावी
चालो रंगीत दंगा

पहुडले ऊन जरा
एकेका रंगावर
रंगीत उन्हं किती गोड
रंग पांघरून अंगावर

सोहळेच हे आगळे हो
पारणे असे फिटावे
कसल्या कोणत्या रंगात बरे
ईश्वराने भेटावे

रंग रंग त्याचाच
संग संग त्याचाच
कळेल तर श्रीरंग
न कळता बेरंग

आपण मात्र एकच करावं
प्रत्येक रंगात न्हाऊन जावं
उन्हातल्या सावल्यांनीही
रंगांना पाहून घ्यावं

दि. २१/०१/२०२३
रात्री ११.४७ वा.




## (३५)
## उमलून रोज यावे

फुलल्या फुलास सांगा
किती रंग सुंदराचे
त्या पाकळ्या मृदुलशा
मन उमले अंतराचे

नाजुकसे हृदय त्याचे
अलगदसे पांघरावे
आतून परिमळांनी
गंधास सावरावे

फिक्या जांभळ्या छटेची
फुलराणी डोलताना
उमलुन पाहते अर्धी
कळी काही बोलताना

म्हणते मनात माझ्या
सखी स्वप्ने डोलणारी
भाषा अबोल तरीही
गुज सारे बोलणारी

होत्या अजून काही
मिटलेल्या त्या कळूल्या
होईल केव्हा फूल
त्या वाट पाहिलेल्या

हे चक्र चालते ना
उमलून रोज यावे
होता कळी मनाची
सुमनेची रोज पहावे

दि. २८/०१/२०२३
सायं. ०५.४२ वा.



(३६)

**एक गाव असतो ना**

गावच्या लाल मातीची
वाट गोरीमोरी
किती ग लपलेली
भावखेळी चोरी चोरी

तिला पाहण्याच्या साठी
पहाटेला गर्दी मोठी
वाट शांत असायची
मजनू झाडापाठी

जायची ती पाण्याला
घट कमरेवरती
श्वास अडखळणारे
सारे पाहून तरती

तिचे मोकळेसे केस
थोडे रुळती गालाशी
वाट चुकती गलबते
इथे खल्लास खलाशी

थोडी पान सळसळ
ऐकून शोधायची
कुणी मागावर आहे का
अंदाज ती घ्यायची

अजूनही मी जातो
गावाकडे न जेव्हा
वाट रिकामी पहाटे
भरे आठवांनी तेव्हा

तिच्या पाऊलखुणा त्या
अजून शोधतो मी
तिची नजर गहिरी
अजून डुबतो मी

एक गाव असतो ना
एक तीही असते ना
कुणी नसते तरीही
तिची स्मृती वसते ना
हृदयात बसते ना...

दि. २९/०१/२०२३
सकाळी ०७.४८ वा.



## (३७)
## पुढच्या क्षणाला होईल काय

आईचं लेकरू
शहाणं ते कोकरू
कसा खायचा पाला
शिकतंय भरभरू

गरीब आपुली
शेळीची जात
काट्याकुट्यातून
हिरवी पात

देवानं दिलीया
जिभली अशी
काट्याला न जुमाने
धिटाची जशी

चढ असं कुंपणी
उंचावून मान
पटापट ओरबड
पाला हिरवा छान

इथे न कुणाची
भीती आपुल्याला
काट्यातले पालवे
न खाता येती कोणाला

खाऊन घे तू जगून घे
कोकरा क्षणाला बघून घे
भरवसा न्हाय कुणी येईल काय
पुढच्या क्षणाला होईल काय
पुढच्या क्षणाला होईल काय

दि. ०४/०२/२०२३
सायं. ०७.११ वा.

## (३८)
## मनी हळवा पाऊस

कातड्याच्या रंगावर
माया कशी हो असंल
जो की काळजाचा रंग
पक्का मनासी ठसंल

जीव लावणं ही रीत
साऱ्या साऱ्यांची समान
गावकुस असू दे की
शहर मोठ्ठं जगजान

लळा जिव्हाळा लागतो
आपुलकी जल्मा येई
डोळं वाचून बघावं
मन प्रतिबिंब होई

माणसाला जपण्याची
बांधलेली खुणगाठ
काळंकुट्ट गोरंपान
कसं चित्ताचं त्या काठ

प्रीत रीत चालतीया
रती मदनाची हौस
प्रेम भरून येताच
मनी हळवा पाऊस

दि. ११/०२/२०२३
दुपारी ०१.५३ वा.



## (३९)
## तिथे चंदनी भाव उरे

या प्रेमाला रेशीम बंधन
प्रेम सृष्टीचे सुंदर स्पंदन
धडकुन हृदयी जे जे राहते
त्या प्रेमाला जगती वंदन

देहावरती निव्वळ प्रेम न
प्रेम करावे अंतरावरी
क्षणा क्षणाला वाढत राहील
असे प्रेम हे येवो बहरी

सखोल ऐशा प्रेमासाठी
कोण ठरवुनी देईल एक दिन
एक दिवसाचा नसे सोहळा
हे तर वाढे पळपळ प्रतिदिन

स्पर्शामधुनी अनुरागाच्या
उमलुनी येतील मधुरा बागा
आळवीत जावे सूर लयीने
सुंदर प्रीतीच्या त्या रागा

प्रेमासाठी पाळून वचने
शब्दांचे नको फोल हे तोरण
प्रेम झळकते डोळ्यांमधुनी
आणि जन्म हा ठेवा तारण

व्यक्तिमधल्या व्यक्तीसाठी
आत भावना फुलून यावी
तिच्या सुखासाठी मग हृदयी
प्रीत कलिका खुलून यावी

देता यावे सारे सारे
अलगद माझे सर्व समर्पण
प्रेम आणखी काय असावे
कण कण आयुष्याचे अर्पण

समजून जावे तुलाही सारे
खेळ मनाचे नितळ खरे
देहापलीकडे प्रेमा नगरी
तिथे चंदनी भाव उरे

दि. १४/०२/२०२३
सकाळी ०६.१७ वा.



## (४०)
## सांगा बरे दिव्यांनो

सांगा बरे दिव्यांनो
रात्रीस काय झाले
जळता अखंड तुम्ही
जळता मलाही आले

कोणा प्रकाश देण्या
सांभाळुनी निखारे
आहे कुणी का समजून
या काळजास घ्या रे

कसे विझवितो क्षणात
ती पेटलेली ज्योत
वारे फुशारकीने
होतात ओतप्रोत

आतून आग पेटे
अंधार दूर होतो
धुमसून राहताना
रडवून धूर जातो

हा देह झिजवुनी रे
तुम्ही उजेड देता
ती घेऊनी उदासी
पहाटेस नव्या नेता

येईल नक्की कोणी
हा वारसा जपाया
ज्याला जळून हसणे
कळते सुखास द्याया

दि. २४/०२/२०२३
सकाळी ०६.३८ वा.

## (४१)

## गझल

(वृत्त- आनंदकंद )

पाण्यात पाहण्याची खोडी जुनीच आहे
तोडून राहण्याची खोडी जुनीच आहे

भारानं वाकलेल्या खांद्यास कोण जाणे
ओझ्यास वाहण्याची खोडी जुनीच आहे

मस्तीत चाललेल्या हत्तीस पाडण्यासी
मुंगी सरावण्याची खोडी जुनीच आहे

येती उगाच व्यर्थ स्वप्ने पहाटवेळी
त्यालाच चाहण्याची खोडी जुनीच आहे

त्या कोवळ्या कळ्यांचे चुरडून गाव देणे
जखमांनी दाहण्याची खोडी जुनीच आहे

दि. १६/०२/२०२३
रात्री ११.१४ वा.



## (४२)
## जाणता रंगास त्याच्या

या बदलत्या मोसमाचे
रंग सारे चाहती
आतुनी रसरंग कितीसे
केशराने नाहती

का उगा वेडी ही पाने
फुल होऊन डोलती
सुंदराचे रंग भगवे
अंतरी ते तोलती

झाड झाडे उमलुनी
जीवना नवं पाहती
झुळूक थंडाव्याची आणिक
स्वप्नं काही वाहती

वाटा वेड्या या फुलांच्या
अंथरूनी त्या पायघड्या
प्रेयसीच्या पावलांची
वाट पाहतो केवढ्या

येई कोणी मोहिनी
मोहुनी जाता जरा
हे ऋतू मग सोहळ्यातून
रंग भरती तो खरा

कोण तो वेडा कसा रे
निर्मितो रंगावली
जाणता रंगास त्याच्या
पावली हो पावली

दि. २४/०२/२०२३
सकाळी ०७.१३ वा.



## (४३)
## त्या अंधारातून जागते

गाळून पडते इथे चांदणे
अंधाराची चाळण
काळ्या काळ्या कुट्ट रातीला
आशाफुलांची माळण

ही सरणारी न थांबणारी
कशास चिंता गहिरी
भीती अनामिक नको काळजा
ठरण्या देऊ जिव्हारी

कधी अमावस कधी पौर्णिमा
आत टिपावे धागे
त्याही क्षणांना जगुनी घेता
जीवन नवेच जागे

जरी अंधारली रात्र भयानक
घट्ट मिटावे डोळे
आत सापडे प्रकाश थोडा
स्वप्नंही काही भोळे

मग उघडावे अवचित दोन्ही
नेत्र नव्याने पाही
त्या अंधारातून जागते
वाट नव्याने काही

दि. ०५/०३/२०२३
सकाळी ०९.१३ वा.



## (४४)
## चला रंगू या निज रंगातून

रंग ठरलेले आयुष्याचे
कुणी तसे ते ठरवावे
फुलेही जेथे देती सोडून
ठरलेपण का मिरवावे

इथे जुईने रंग पांढरा
सहजीच सोडून हा दिधला
रंग पिवळसर अंगावरती
हळद लावली कुणी तिजला

निश्चित ठरले काही नियम की
संकेतांच्या त्या ओळी
निसर्ग सुद्धा खेळत राहतो
रंगीबेरंगी जणू होळी

सारे सारे रंग शोभती
लेऊन पहावे त्यांस खरे
हा आवडता तो नावडता
कशास नखरे त्यात बरे

चला रंगू या निज रंगातून
श्रीरंगाची उधळण जी
रंग त्याचे ते मोरपिसाचे
रंग साजिरे उसळण की

रंग रंगेरी निळे चंदेरी
सोनेरी लाल पिवळे हे
हिरवे बरवे आणि केशरी
काळे कुठे ते ढवळे जे

रंग ओततो तो रंगारी
आयुष्याच्या वसनावर
घ्यावे जावे रंगून अलगद
क्षणाक्षणांच्या असण्यावर

दि. ०६/०३/२०२३
सकाळी ०८.३२ वा.



## (४५)
## रास रंगून हसे श्रीरंग

सुगावा लागला आता
रंग गेले कुठे होते
सकाळी प्राचीवर पसरून
सांजेला रंगले होते

रोजचे रंग निराळे जे
फुला पानात दडलेले
नभी उमटून इंद्रधनुने
रंग सोहळे ते घडलेले

दिशा रंगून जाताना
उषा रंगाळली जाते
निशा रंगात डुंबूनी
अशी गंधाळली जाते

रंग स्वर्गीचे उतरून
उद्यानी काननी खुलती
रंग पंखात मोराच्या
होत लावण्ये हो डुलती

रंग खडकात पाषाणात
रंग रतनांच्या खाणी
कधी हिरवे निळे भुरकट
कधी रंगीतसे पाणी

ही धरा रंगशालू ल्येते
ऋतूंच्या कमानीत न्हाते
रंग मनी होऊनी सरिता
सुखाचे दान देत वहाते

असे हे रंग दिसती बाहेर
अंतरी वेगळाले रंग
आतुनी जोडताच त्याला
रास रंगून हसे श्रीरंग

दि. ०७/०३/२०२३
सकाळी ०८.२७ वा.



## (४६)
## निज खुशीत रमावे

रानोमाळी उमलती
फुले गुपचूप दूर
त्यांचे कराया कौतुक
यावा काळजास पूर

रंग गुलबक्षी छान
माय राखेरी पान पान
बाप काटेरी जरीही
त्यांचे वारस तुफान

कोणी रसिक न तेथे
तरी उमळण चाले
रोज फुलून हसावे
राती गुमान बसावे

नच कोणीही पाहिले
नाही अजिबात खंत
असे भाळणे स्वतःवर
मग कसली उसंत

असे रुमावे झुमावे
आपल्यातच गमावे
रानफुलासारखेच
निज खुशीत रमावे

दि. ०९/०३/२०२३
सकाळी ०९.१६ वा.



(४७)

## पोट नको दे माणसा

भूक पोटाची पापीण
तिला नाही घेणे देणे
घास गिळण्या मिळावा
तिचे एकच म्हणणे

खाती तोंडं कशी बांधू
दाण्याविना कशी रांधू
माया वाढून वाढून
भूक सांगा कशी थांबवू

चूल कशीबशी पेटे
एकदाच दिवसात
भीक मागून मागून
मिळे ना मिळे हातात

पोर भुकेजली माझी
कुणी दिलं हो पाकीट
खाते अधाशी वेडुली
किती द्यावी हो ताकीद

रोज रोज हीच चिंता
आज खायला मिळेल
की उपाशी झोपावे
पाणी कसे हो गिळेल

एक कर देवा आता
पोट नको दे माणसा
नाहीतर गरिबीच्या
पूस पुरत्या कलंका

दि. १०/०३/२०२३
सकाळी ०७.४२ वा.



## (४८)
## खरंय ना ग पत्रपेटी !

गंजत चालल्यात ग
भावनाही माणसाच्या
खंगत चालल्यात संवेदना त्याच्या
कुठे आहे ती आपुलकी,
जी शब्दातुन पत्रात उतरायची
आधार, सोबत, साथ सारं
काही निःशब्द करायची

प्रगती झालीय म्हणे ग बाई
आता खूप सारी
हातात यंत्र आलेत
अन् सुखं उभीयत म्हणे दारी

आपलं आपलं पाहण्याची
कसली वृत्ती बळावलीय
काय माहीत
आता नातलग, सखे सोयरे
कशा कशाला फारसे लागतच नाहीत

तू नाही का सगळ्या भावनांना
आपल्यात साठवायचीस
जशाच्या तशा त्या जपून
पुढे पुढे पाठवायचीस
तूही आनंदायचीस,
खिन्न व्हायचीस म्हणे पत्रातल्या शब्दांनी
आता तुझ्याकडे कोणीच फिरकत नाही
आपल्या पावलांनी

किती वाट पाहतेस ना ग
गावी असलेल्या एकट्या आईसारखी
पडेल कधी तरी एखादं पत्र मनमोकळं
आणि नसतील नाती नात्यांस पारखी
येतो रोज पोस्टमन
त्याची नोकरी म्हणून तुला पाहण्यास
पण अश्रूच ढाळून जातो
बघ रिक्त कहाण्यात

नको अशी उदास होऊस,
भंगलेल्या अवशेषांमुळे
काळजाची पडझड झालीय ग
नव्या विचारांमुळे
ख्याली खुशाली आता
क्षणात कळवता येते
शब्दांचे पसारे, भावनांचे पिसारे,
आवेगांचे धुमारे आता काय कामाचे

आतून पाहिले तर अशीच
मोडकळीला आलीयत मनं सगळ्यांची
वरून फक्त मुलामे दिले आहेत त्यांनी
जे तुला मला नाही जमणार कधीच
आतून एक बाहेरून एक,
खरंय ना ग पत्रपेटी !

दि. ०१/०४/२०२३
सकाळी ०९.१२ वा.



## (४९)
## साद घुमते अंतरी

आगगाडी नागमोडी
स्मृतीनाद घुमतो जो उरी
मन कुठे हरवून जाते
साद घुमते अंतरी

पाहते बाहेर सारे
हिरवे हिरवे गालिचे
नटलेली ही धरणी आणिक
सोहळे पाचूचे तिचे

सानुल्या हे गवतुल्यांनो
डोलुनी वाऱ्यावरी
जीव इवला नाही दमला
हासुनी वरचेवरी

नाही कसली चिंता आणि
काळज्या कसल्या तुम्हा
रमणे नुसते आपुल्यातच
धुंदीतुन गाणे पुन्हा

मीही रमते विसरूनी हे
दु:ख सारे आतले
कोणता हा मंत्र देता
गारुडही जे टाकले

वाटते ऐसेच चालो
ही प्रवासाची कथा
ना कुठे शोधून मिळते
अंतरीची मग व्यथा

दि. २८/०३/२०२३
सकाळी ०८.४३ वा.



## (५०)
## फुलून सार्थक वाटावं

दारामध्ये उमललेलं एक रोपटं
डोलून जातं
हसऱ्या त्याच्या पानाफुलातून
हळूच काही बोलून जातं

सांगत असतं आकार आहे,
उंची आहे की रंग तरी
हातात आपुल्या जीवनरस मिळतोय ना
आणि रोज नव्याने खुलतायत कळ्या

हिरवी पाने निळीशार फुलं
त्यावर फिक्या पांढुरक्या छटा
माळून आम्हास सजवून देते
रमणी कुणी आपल्या बटा

कुणी वेडा फुलांचा नुसतेच पाहत राहतो
गंध त्याच्या अंतरात कित्येक दिवस
वाहत राहतो

दमल्या भागल्या डोळ्यांचा
आम्ही क्षणिक दिलासा
प्रीतीमधले नाजूक भाव गोड आम्ही
खुलासा

कुणी कवटाळून हृदयाशी
हितगुज निःशब्द मांडत जातं
अवेळीच भावचांदणं
वाटेवरती सांडत जातं

राहतो कधी पुस्तकात
जपून ठेवलेले क्षण बनून
जगणे कृतार्थ वाटते कुणा
केवढा आधार आपला म्हणून

फुलून सार्थक वाटावं
इतकं प्रेम मिळतं जेव्हा
खरं सांगू सुकणं सुद्धा
जीवावर येतं तेव्हा

दि. ०३/०४/२०२३
सकाळी ०९.२४ वा.



## (५१)
## रंग आपुले स्वच्छंद कलंदर

जगण्यामधले रंग असे
अंगावरती पसरून द्या
उधड उधडल्या रंग उडवत्या
चिंता साऱ्या विसरून जा

डोळ्यामधले चित्र रंगले
समोर दिसते ते ते रंगीत
कुणा ऐकू येईल ऐसे
ऐकून घ्यावे आतले संगीत

रंग फुलांचे अन् पानांचे
ऋतुऋतुतील रंग टिपावे
शिशिरातही गळतीचे हे रंग
अनोखे मना दिसावे

रंग पंचमी रोज देखणी
निसर्गातली घ्यावी जाणून
जेही मिळाले रंग आपल्या
रंग सुखाचे घावे मानून

मौनाचेही रंग निराळे
शब्दांना तर छटाच सुंदर
असा कशिदा रोज भरावा
रंग आपुले स्वच्छंद कलंदर

दि. ०४/०४/२०२३
सकाळी ०६.५३ वा.



## (५२)
## तरी रोज चित्र न्यारे

उधळून कोण देतं
सोन्यात गाव न्हातं
ती लाल माणकाची
ऐश्वर्ये साठवीत

केला कुणी फवारा
पहाटेस प्राचीवरती
सांडून गेली नवखी
ती केशराची पोती

पाण्यात निरखे वाकून
ते नितळसे हो दर्पण
पाणीही मग्न पाहण्या
करते स्वतःस अर्पण

ना एक लाट उठते
सारेच शांत शांत
काठावरी पहुडली
सृष्टी पहा निवांत

सारेच गुंतलेले
रंगांचे खेळ सारे
होते सकाळ रोजच
तरी रोज चित्र न्यारे

दि. ०८/०४/२०२३
सकाळी ०७.३४ वा.



## (५३)
## हिरवा उत्साह सांडला

रोज खुणावते दाटी
झाड झुडुपांची ताटी
हिरवा उत्साह सांडला
पानापानाच्या उराटी

काळ्या कुट्ट अंधाराला
रोज गुडूप करून
एका तेजाला भरते
तेजशालू पांघरून

डोंगरात लपलेली
गर्द निळाई डोलते
रोज रोज एक भाषा
जगण्याची ती घोळते

वर गगनात झूल
आकाशाची नवलाई
कधी टेकते खाली ते
क्षितिजाशी लवलाही

असे वाटते जर का
खरे खरे जगावे
मग निवांत इथेच
भुईवरती निजावे

घ्यावे मिटून त्या घट्ट
भुलवणाऱ्या डोळ्यांना
आत केवढा प्रकाश
सामावतो भावनांना

दि. ०७/०४/२०२३
सकाळी ०७.१३ वा.



## (५४)
## आयुष्य रम्य रमले

हे बुडत्या भास्करा रे
नाही अजून दमले
माहीत आहे मजला
आयुष्य रम्य रमले

उलटून रोज जाते
काळी कभिन्न तमली
घेऊन रोज येते
पहाटेस प्राची रुमली

उठतात रोज लाटा
निवतात त्या स्वतःच
सरकून काळ जातो
होते नवं सुरवात

मीही नव्याने रोज
उगवून येत राही
झाली निशा जरीही
स्वप्नात वाट पाही

येतोस तू खुलुनी
उत्साह वाटतो ना
मजसी पुन्हा नव्याने
किरण हा भेटतो ना

दि. ०९/०४/२०२३
सकाळी ०६.४३ वा.



## (५५)
## वय हे खुणावे सदाच नंतर

असेच निरखून पाहत मजला
दृष्ट काढीते कुणी
कुणी निहारते सौंदर्याला
किती लावण्ये गुणी

खोल खोल नजरेत डुंबते
कुणी गाहते मनी
कुणी हरवते अन स्वप्नांच्या
निबिड अरण्यातुनी

खुले सोडले केश लहरीले
झुळ झुळ वाऱ्यावर
मीच न राहते माझी माझी
अशीच थाऱ्यावर

वय कोवळे यौवनातले
रसरसले अंतरी
उगा वाढते कधी कशाने
धडधड ही मज उरी

कुणी पाहते एकटक मज
मीच ओघळून जाते
भावमौक्तिके वेचत वेचत
स्वतःस माळून पहाते

क्षण हे थोडे चार दिसांचे
नको व्यर्थ दवडण्या
मनात उमले वसंत आता
काहीतरी घडण्या

वय हे खुणावे सदाच नंतर
म्हणून जगून घ्यावे
तारुण्याच्या उंबरठ्यावर
स्वर्गा मागून घ्यावे

दि. १२/०४/२०२३
सकाळी ०६.१० वा.



## (५६)
## उरल्या खुणा उराशी

जावे अशा ठिकाणी
जुळतील बंध काही
असशील सोबतीने
चिंता मनी न राही

ही कलती उन्हे सांज
आयुष्य पैलतीर
वाहते मधून खळखळ
नदी आठवांचा भार

थरथरती पावले अन्
जरी हाती काठी आली
तव संगती प्रिये ही
सांगता सुरम्य झाली

चालून पाहिले की
सारेच मार्ग आता
राहतील काही मागे
पदचिन्ह वळून पाहता

मिळतो किती दिलासा
तू साथ चालताना
भय वाटते ना काही
पाहून सांजछाया

दमवून जन्म गेला
उरल्या खुणा उराशी
का थांबते अजूनी
सुखदुःख पापण्यांशी

दि. १३/०४/२०२३
सकाळी ०७.४२ वा.



## (५७)
## दरवळू द्यावा मनातून मरवा

कुणी किती साथ द्यायची
हे त्यांचं त्यांना ठरवू द्यावं
कुणाचीही साथ नसताना
बहराला अंगाखांद्यावर खेळू द्यावं

दूरवर एकही पान फांदीवर नसतानाही
फुलांनी लगडून जातो न चाफा
कुणी वाहवा करायला असो नसो
तो बापडा बागडून जातो न चाफा

त्यालाही भेटतात ऊन सावल्या
दाखवत वाकुल्या
तो कशाचीच पर्वा करत नाही,
सावल्या मोठ्या की धाकुल्या

त्यानं एकच ठरवलेलं असतं
आपल्या अंतर्मनाशी घट्ट
काहीही झालं तरी फुलून उंच
टोकांवर फुलांना मिरवायचं पक्कं

रोज सकाळी सूर्य पाहतो ना
त्याचा तो हसऱ्या फुलांचा भरवा
बाहेर बहार वसंताचा की असो
शिशिर दरवळू द्यावा मनातून मरवा

दि. १४/०४/२०२३
सकाळी ०५.४३ वा.



## (५८)
## जणु भाव हे अव्यक्त

झुपके खरे की खोटे
आशंक होते मन हे
असते बडीच किमया
जो रेखितो सुमन हे

हिरवाईच्या कुशीत
राशी कुसुम खुशीत
पोसून मोठ्या होता
हसतील कळ्या मुशीत

कोठून आणतो तो
इतकी तलम प्रजाती
दल रेशमाचे अंग
सृष्टी ही विणते नाती

किती शुभ्र धवल रंग
चुटुक लाल ते घोस
वेलीवरी उमलले
सौंदर्य जयघोष

ही केवढी विविधता
किती संगती जुळाव्या
कलाकार तो विरळा
त्या कामना खुलाव्या

पाहून दृष्टी तृप्त
मन होत जाते भक्त
टिपण्या नजर मिळावी
जणु भाव हे अव्यक्त

दि. १४/०४/२०२३
सकाळी ०९.१४ वा.



## (५९)
## आठवणींच्या पिंपळगाठी

गावामधल्या पिंपळतळी त्या
किती खेळलो झाल्या गप्पा
घराकडे मग जाण्याआधी
इथेच विश्रांतीचा टप्पा

पानोपानी सळसळ होऊन
तोही अनुमोदन देतसे
माझ्या संगे थोडे रमुनी
सुख जरासे तोही घेतसे

असो ऋतूंचे चक्र कोणते
त्याची सावली शीतल वाटे
आजही मजला किती दिलासा
त्याच्या पारावरती भेटे

उगा वाटते तोही झुरतो
माझ्या आठवणीतून मुरतो
क्षणोक्षणी तो माझ्या देखील
सुंदर स्मृतिकोशातून उरतो

आठवणींच्या पिंपळगाठी
रुजून जाती अशा खोलवर
रुंजी घालून मोह क्षणांची
अमोल करतील त्याचे मोल तर

दि. १९/०४/२०२३
सकाळी ०९.१३ वा.




## (६०)
## शेतकरी हा राजा व्हावा

रापुन गेली अंग कातडी
उन्हात तळपुन राबता
जीव करपला तरी न थांबला
हात तयाचा राबला

भान हरपले क्षणाक्षणाला
सदा जीव तो ओतला
जळून गेली पिके कोरडी
कधी ओलिता मातला

काळी माऊली भेगाळली अन्
दुभंगलेली कूस तिची
वाहून आसवे दुःख डोंगरी
जपतो भावे मूस तिची

घरी उपाशी तोंडे सारी
तरी न खचतो पुन्हा उठे
काळ्या आईच्या उपकाराची
फेड करावी कुणी कुठे

शेतामधले देव पुजूनी
अन्न मानवा देई प्रसाद
पोशिंदा हा बाप शेतकरी
त्यास मिळावे सहाय्य अगाध

असा असावा शासक हळवा
प्रजाही जाणो ते उपकार
शेतकरी हा राजा व्हावा
कष्ट तयाचे अपरंपार

स्वप्न फुलावे कोंब उगवुनी
डोलत जाव्या राशी धान
पुन्हा मिळावा शेतकऱ्याला
सर्वाहून अधिकचा हो मान
सर्वाहून अधिकचा हो मान

दि. २४/४/२०२३
रात्री ०८.२० वा.



## (६१)
## अमृत मिसळो जळीही

खडक गोटे दगड धोंडे
असू दे नशिबी कितीही
कधीतरी मग उगवून येऊन
डोलून फुले अमितही

सुख वेलीवर फुले उमलुनी
जरी हासली एकदा
दुःख डोंगरासम ते तरीही
क्षणात विरेल बहुधा

ओसाडातून हिरवाईचा
कोंब जपून मी ठेवीन
हुळहुळणाऱ्या स्वप्नांवरती
जरा विसावू पाहीन

कुठून मिळाले बळ त्या वसंता
असे नको न विचारू
आत मी जपला खोल ऋतू जो
बहरून येई सुचारू

क्षण मोलाचे फुलाफुलांचे
असे मी गंध जपावे
दगड गोटे उशीला ठेवून
आता न मागे हटावे

उरी फुलांना पहावे खुलते
खुलून यावी कळीही
झरा प्रेरणेचा तो वाहून
अमृत मिसळो जळीही

दि. २६/०४/२०२३
सकाळी ०८.१३ वा.



(६२)
## मनाचा मोर भावविभोर

एकदा जर ठरवलं मनाच्या मोराला
सर्वांगसुंदर सजवून द्यायचं
पिसाऱ्यातल्या एक एक पंख भावनेला
विचार रत्नाने नटवून द्यायचं

मग रंग सारे मनमोहक
उतरून यावेत आतल्या मनाच्या कुपीतून
मिसळून जावेत बेमालूम एकमेकांत
वाचता यावेत अक्षरे काही सौंदर्याच्या
लिपीतून

नभाला भरते यावे वेळी अवेळी
अंतःकरणाच्या अंगणात
थुई थुई नाचता यावे
टपोऱ्या गाणाऱ्या थेंबांच्या रिंगणात

वळून वळून मन वळवून
पाहता यावे तटस्थतेने
आपल्याच घडलेल्या सुंदर
आयुष्याच्या पिसाऱ्याला

एक आनंदाचा तुरा मिरवता यावा
मस्तकावर सदैव ऐटीने
आणि अंगांगावर फुलून याव्यात
निजरंगांच्या अतुलनीय छटा दिमटीने

डोळ्यातले ते तेजच बोलते व्हावे
निजानंदांच्या राशींना
फांदी असो भुई असो
की रानातला एकांत
मयूर होत आकर्षून घेवो
आपल्याच खुषींना

म्हणून म्हणते मनाचा मोर भावविभोर
जपू या न त्याला, त्याच्या लावण्याला
मग काय आनंद आपलाच, देखणेपण
आपलंच, कायम आपल्या गाठीला

दि. ०७/०५/२०२३
सकाळी ०८.१३ वा.



## (६३)
## मनाचे द्वंद्व

मनाचे द्वंद्व सतत चालणारे
एक मन हो तर एक नको म्हणणारे
दोघांचेही पिसारे फुललेलेच
दोन मोर मनाचे खुललेलेच

होकार देणारेही तेवढेच उमेदीचे
नकार देणारेही मोठ्या ताकदीचे
कुठे जावे कळतच नाही
दोघांच्या ओढाताणीत
रस्ता काही वळतच नाही

द्वैत की अद्वैत गुंता काही सुटत नाही
दोन्हींचे रूप अंतिम एकच,
तरी मनाला पटत नाही
द्विधा स्थिती आजची थोडीचंय
युगानुयुगे त्यालाही तर
दोनात विभागल्याविना सुटत नाही

जरी एक असले तरी
दोन होऊन जातो तो
शिव सुंदर शक्तिमध्ये
सामावून जातो तो
ती त्याची खरी शक्ती
की तो तिचा खरा आधार
ते एकच मग साकार की निराकार

नाचू देत थुई थुई दोन्ही मोरांना
आपल्याला एवढेच कळावे
की समजून घ्यावे दोघांना
एक कोऽहं म्हणेल तर दुसरा सोऽहं
अहं ब्रह्मास्मि जाणवले की
संपले सारे द्वंद्व

मग दोन्ही मोर एकच होतील
तेही आपल्या मनाच्या पलीकडे
जाणिवांच्या वाटेने नेणिवांच्या ध्येयात
पैलतीर येईल अलीकडे

दि. ०८/०५/२०२३
सकाळी ०८.२३ वा.

## (६४)
## भेट अर्थ देते

भेट कधी कैसी घडते
जीवनी कुणाची
सहजी जुळून येते तार
हळव्या या मनाची

पुन्हा घडाव्या त्या भेटी
असे कधी वाटे
कधी आस अंतरात
भेटण्यास दाटे

अनपेक्षित भेटी काही
सुखावून जाती
घट्ट विणून शेला होती
गोड मधुर नाती

भेट अपेक्षित जी असते
वाट किती पहावी
जीव ओवाळीला तरीही
भेट परि नाही

एकएका भेटीचे हे
क्षण सांधणारे
आठवणी घडती ऐशा
पट मांडणारे

कितीतरी भेटी ऐशा
कशाला घडाव्या
जणू पायी त्यांच्या जोखड
साखळ्या पडाव्या

एक भेट बदलून जाते
जीवनास साऱ्या
कधी दुःख देते आणिक
सुखा पावणाऱ्या

जीव शिव भेटीलागी
भेट सार्थ होते
पुन्हा नको जन्ममरण
भेट अर्थ देते

दि. ०६/०९/२०२२
सायं. ०६.०२ वा.



## (६५)
## त्या हृदयाने हे हृदयही चिंब

तलम तरल किती कवळे कवळे
गर्भरेशमी स्पर्श भावले
या पानांच्या पारदर्शी
सुंदर हृदयी हृदय मावले

रंग गडदही रंग फिके ते
सुरंगी चित्रही असे दिसे ते
हे कवळेपण आरंभाची
नांदी होऊन सृष्टी नांदते

असेच हळवे मनही असावे
वाऱ्यासंगे तेही हसावे
रंग सारे सारे ते आपुले
कृष्ण काळे ढवळे विलसावे

जाडेभरडे पोक्तपण आले
जीर्ण शीर्ण म्हातारपण झाले
तरीही मनात कोमल कवळ्या
नाजूक बालपणाला जपले

शरीर असू दे परिपक्व किती
मन असावे मृदुल मृदुल अति
स्वच्छ सरळ पडता प्रतिबिंब
त्या हृदयाने हे हृदयही चिंब

दि. ०८/०९/२०२२
सकाळी ०७.३४ वा.



## (६६)
## रोज नव्याने पुन्हा उगवणे

नको कारणे पराभवाची
जिद्द न सोडा कधी जगण्याची
आत असेल जर दृढा प्रेरणा
शाश्वती आपुल्या हाती तगण्याची

कुणीतरी येईल तोडण्या
आत्मविश्वासा नको गमविण्या
तोडणे त्यांचा धर्म असे तर
रोखले कोणी पुन्हा उगविण्या

कधी वादळे येतील सूंऽऽ सूंऽऽ
मोडून देतील पुरी आरजू
तरी मुळांना जपून ठेवत
पुन्हा नव्याने स्वतःच उगवू

हात आपुला आपुल्या हाती
घट्ट धरावा कशास भीती
नकोच कसले दडपण घेऊ
नको अंधाऱ्या भयाण राती

चैतन्याची मूस करारी
मातीमधुनी घेत भरारी
नवी पालवी जुनीच फांदी
सृष्टी नव्याने जगणे मांडी

चला शिकू या असे वागणे
नकोच गळणे नको हतबलणे
पुन्हा चेतवू ज्योत आतली
रोज नव्याने पुन्हा उगवणे

दि. ०९/०९/२०२२
रात्री ०७.५७ वा.



## (६७)
## चालण्यातसे वेगळी गोडी

भर्र्र्र्र्र्र चालते यान रेल हे
क्षणात काही पडते मागे
क्षणात पुढचे आपुल्या पुढती
पुन्हा नव्याने नवेपण जागे

प्रवास आयुष्याचा ऐसा
क्षण थांबवता न थांबे कैसा
गेले ते गेले क्षण सारे
पुन्हा नव्याने जगण्या जैसा

आठवणींचे असेच असते
गाठोडे सोडून ती बसते
पट चालतो नजरेसमोरून
काळवेळ त्यांना कधी नसते

मिटून घेता डोळे क्षणभर
दृश्य यानातील द्यावे साठवून
आतबाहेरी जे ही साचले
पुन्हा धावण्या द्यावे पाठवून

सर सर सरके गती केवढी
मधेच थांबे क्षणी स्तब्ध ही
स्मृती असो की वाहनगाडी
चालण्यातसे वेगळी गोडी

दि. ०९/०९/२०२२
रात्री ०८.२० वा.



## (६८)
## **बदले जनांचे बघणेही**

हे झुकलेले गेंद बोलती
झेंडूसारखे वागा
भरीव तुम्ही होऊन स्वतः
विनम्रतेने जगा

झाड कसले ते झुडूप इवलुसे
पाने लांबट नाजूक फार
किती घट्टसर भरीव भरती
झेंडूची फुले झुपकेदार

पेलवतील का नाजूक झुडुपा
तरीही अगणित फुलतील ती
वारा येवो अथवा नाही
स्वतःच खुशीत डुलतील ती

तसे पाहता रूप फारसे
नसे देखणे झेंडूचे
तरी उत्सवी रूप खुलविती
माळा नि तोरण झेंडूचे

कुठून आलो कूळ कोणते
मूळ असो वा बेताचे
आपण फुलणे फुलून झुलणे
उपयोगी पडणे हे व्हावे

शोभा वाढेल कुणाचीतरी
असे असावे जगणेही
बदले जग मग दृष्टी बदले
बदले जनांचे बघणेही

दि. १४/०९/२०२२
सायं. ०६.१४ वा.



## (६९)
## सुख मनमंदिरात

एक सुखाची रेघोटी
एक दुःखाची ही रेघ
जीवनाच्या संध्याकाळी
देहाकाशी दाट मेघ

आठवांच्या धारा साऱ्या
कोसळून धडाडती
विजा चमकून काही
प्रसंगही कडाडती

किती सोसले कष्टले
किती भोगले मी सारे
किती आनंदाचे क्षण
किती हळुवार वारे

जीवनाच्या पटावरी
नक्षी विणतो हा काळ
देहा त्याच नक्षीसाठी
मान आनंद सुकाळ

एक एक सुरकुती
ताजी तवानी दिसते
आत मन ना म्हातारं
मीही आतून हसते

किती चमक डोळ्यात
उमेद ही अंतरात
वय येणार जाणार
सुख मनमंदिरात

दि. २१/०९/२०२२
सकाळी ०८.३३ वा.




## (७०)
## इतुके सुंदर सुमन जयाचे

पिवळ्या धम्मक तलम पाकळ्या
झुडुपाला नसतीच झावळ्या
फुलास रेघा शिंपल्यापरी
भुईमुगाच्या फुलराण्या आगळ्या

गर्भामध्ये दाणा इवला
दोन पंखुड्या वारा घाला
आत चिमुकला कोंब वाढतो
भुईखाली तो जीव ओवला

कसले सुंदर रूप निर्मितो
क्षणात स्वर्गा जणू वर्णितो
किती काळ हे पुष्प उमलणे
त्यास्तव इतुके श्रम हे उधळणे

प्रत्येकाचे भाग्य आगळे
आपुलेही सौभाग्य वेगळे
पोट एक तरी पदार्थ न्यारे
आपुल्यासाठी घडती सारे

भुईतून आकारास येतसे
भुईमुगाचे रूप लोभस ते
इतुके सुंदर सुमन जयाचे
गुण सांगावे कसे तयाचे

दि. २४/०९/२०२२
सकाळी ०६.३७ वा.



## (७१)
## वात्सल्याचे पहा सोहळे

घरट्यासाठी झाडे न उरली
मानवास घरी जागा न पुरली
कसे कुठे मी बांधू घरटे
कुठल्या छताशी फांदीवर ते

आधी मनही होते मोठे
झोपडीतही निवांत वाटे
आता महालातूनही परके
पक्षी बिचारे झाले पोरके

तसूभरही जागा न मिळते
हाकून पिटाळून लावले जाते
दाणापाणी काहीच नाही
जगण्याची धडपड चालते

दिसला कोठेतरी अडगळीत
जुना पुराना कंदिल गंजत
वेळ जाहली अंडी घालते
पिल्लांसाठी घरटे मांडते

केल्या काड्याकुड्याही गोळा
मऊ मऊ कापूस शुभ्र चांगला
कंदील झाला फांदी डोली
त्यातच झुला मी जणू टांगला

चार पिलांची चिवचिव चाले
दाण्यासाठी जीव धोक्यात घाले
पक्षीण आणते चारा चोचीत
वात्सल्याचे पहा सोहळे

माय माऊली जगी सारखी
मानव असू दे की ती पक्षी
रूप तियेचे दिव्य ईश्वरी
नतमस्तक हो मातेपुढती

दि. २७/०९/२०२२
सकाळी ०७.१४ वा.



## (७२)
## नातं अस्संच असावं

तृण पाचू अंथरले
वर सोनाळी रूपाळी
चढाओढ चाललेली
भुईवर नि आभाळी

वर नक्षत्रांची रात
इथं काजवी खैरात
वर ढग धावणारे
इथं पाऊस भरात

तेज सोनेरी किरणे
चंद्र सूर्य देत राही
वसुंधरा ते सोहळे
रोज नव्यानेच पाही

तिथं इंद्रधनुष्याची
एक कमान रेखता
इथं प्रतिबिंब मनी
सप्तरंगाचे देखता

तिथं आभाळाची माया
देत राही छत्रछाया
इथं धरित्री जागते
साऱ्या जीवा पोसावया

कोणी कोणा वरचढ
नाही कधीच ठरत
आदर परस्परा
सुख नव्याने भरत

नातं अस्संच असावं
एकमेका सावरावं
एक अंथरूण घाली
दुजं पांघरून व्हावं
समझोत्यानं चालावं

दि. २८/०९/२०२२
सकाळी ०९.३७ वा.



## (७३)
## नव्याने मी उगवेन

अशी उमटावी पदचिन्हे की
त्यातून उर्मी फुटावी
नव्या चेतना सांगून जातील
चेतना नवी उठावी

कुणास ठाऊक ओळखील का
कुणी आपुल्या खुणा
कुणास चिंता असेल का तरी
यावे आपण पुन्हा

मातीमधले चिन्ह बोलते
अस्तित्वाचे गूज
कधी कळे का कुणा मूक हे
मज जगणे अलगूज

क्षणिक जीवन क्षणाचे ठसे
क्षणात पुसले जाणे
शब्देविण का ऐकू येईल
कुणास माझे गाणे

सुखी असेन मी की वेदनेच्या
वाहत राही पखाली
अंगावरती ओढून जगलो
खोट्या सुखाच्या दुशाली

परि काळाच्या छाताडावर
कोरून जाईन रेघ
कुणाच्या तरी आठवणीचा
सहजी बरसेल मेघ

ओघळतील जे अश्रू तयांचे
बीज पुन्हा रुजवेन
पुन्हा तयांच्या मनोभूमीवर
नव्याने मी उगवेन

दि. ०३/१०/२०२२
सकाळी ०८.५३ वा.



## (७४)
## या खुलेपणाने क्षणांनो

क्षणांच्या सोबतीने
चालणे नित्य होई
क्षणांवर सोडलेल्या
खुणांचे चित्र पाही

क्षणांच्या सोबतीने
क्षणांना ना दवडावे
क्षणांवर झुलता झुलता
क्षणांना हो निवडावे

क्षणांना जोडून घेता
क्षणांचा पट हा बनतो
क्षणांचे धागे पक्के
महावस्त्रासी विणतो

क्षणांची ओळख ठरते
जन्माची गाठ पडते
क्षण हे मोहून जाता
क्षणातच सारे घडते

क्षण हे हसवे फसवे
क्षणांचे रुसवे फुगवे
क्षणांच्या आठवणींनी
क्षणातच काळही उगवे

क्षणा क्षणांवर प्रीती
ही अक्षय जगणे रीती
क्षणक्षण श्वासासाठी
क्षणक्षण उगाच भीती

या खुलेपणाने क्षणांनो
मज कवेत घेऊन जावे
मी खुललेली हो नित्य
मज सुगंध देऊन जावे

दि. ०४/१०/२०२२
सकाळी ०६.५४ वा.

## (७५)
## फजिती

नेमकं ठरवून जातो काही
घडून जाते काही
फटफजिती झाल्यावरती
हसणे बाकी राही

कधी विचारांचा तो गोंधळ
मनात काही असते
कृती वेगळी घडते प्रसंगी
समर्पक ती नसते

एका पायी चप्पल एक नि
दुसऱ्यातून वेगळी
कधी कानातले वेगवेगळे
मजाच घडते आगळी

कधी सदरा हा उलटा घालून
गुंडी खालीवर होते
कधी फटट्कन तुटतो नाडा
विजार खाली गळते

कधी बोलायचे असते जे ही
विरुद्ध बोलून जातो
कधी भुकेने व्याकुळ असता
नको म्हणाया पहातो

भरले असते टच्च पोट तरी
खावे आग्रही लागे
माणूस जपण्या धडपड चाले
असा वेगळा वागे

कळता घडते कधी फजिती
कधी ती नकळत होते
कधी आपुल्याला कधी इतरांना
खळखळून हसण्या देते

दि. ०६/१०/२०२२
सकाळी ०८.३४ वा.



## (७६)
## देशी पदरी शिदोरी

अशा प्रीतीभोजनाची
गोडी अवीट सुखाची
सारे जमतील घरी
लेकी येतील माहेरी

असू दे साधीसुधी
पानामंदी ग भाकरी
मुखडे उजळले
वसरी ग हासरी

घरकुल मातीचंच
ओढ मातीची माणसा
एकमेकांसाठी सदा
झिजण्याचा हाती वसा

आली चिमणपाखरं
किलबिल पिल्लं भवती
माय सुखावती आज
देव सारेच पावती

असं भरलेलं घर
माझं गोकुळ नांदतं
येता दिवाळी दसरा
सुख ओसांडू सांडतं

देख आईच्या मुखावर
समाधानाला भरतं
न जेवताच तिचं
पोट मायेनं भरतं

देवा सदा घडू दे की
सणवार माझ्या दारी
माझ्या लेकरांची भेट
देशी पदरी शिदोरी

दि. १७/१०/२०२२
सकाळी १०.१३ वा.



## (७७)
## तृप्त अंतरीचे डोळे

गुल्म उमलून आले
कळ्या कळ्या त्या फुलल्या
हळुवार वाऱ्यासंगे
हिंदोळ्यावरी झुलल्या

मन बगीचा होताच
माळी आपणच व्हावे
रंग सुंदर विचारी
बीज पेरूनीही द्यावे

विवेकाचे खतपाणी
आनंदाची गात गाणी
झुळुझुळू पाट वाहो
आयुष्याच्या रम्य वनी

कधी उन्हाचे तडाखे
पाळंमुळं पक्के ठेवू
एक आतला आवाज
सदा ऐकूनिया घेऊ

कधी जोरदार धारा
बरसवतात गारा
भुईसपाट ना होणे
व्हावा स्वतःचा निवारा

वादळांचे सूं सूं धाक
मनसुबे बेचिराख
आहे एवढे सामर्थ्य
आत मनात तू झांक

बाग अध्यात्म उमले
जीव शिवासंगे डोले
काय जाणायाचे आता
तृप्त अंतरीचे डोळे

दि. २०/१०/२०२२
सकाळी ०७.४५ वा.



## (७८)
## असा वारसा परिमळांचा धरू या

उमलत्या फुलांचे असे ताटवे हे
मनातील उमलून आले भाव वाटे

कधी डोलती आतल्या स्व सुखाने
कधी हलवी वारा भाळलेल्या मुखाने

किती गंधकोशात जपले स्वतःला
तरी देत जाईल उधळून स्वतःला

जमावे असे धुंद धुंदीत रहाणे
किती मस्त मस्तीत फुलती बहाणे

जगावे असे नित्य झोकून द्यावे
तूफान येताच वाकून जावे

न ताठरता कुठली नसावाच गर्व
सुकणे जरी पक्के, जगण्याचे पर्व

चला ऐशी सुमने मनांना करू या
असा वारसा परिमळांचा धरू या

दि. २८/१०/२०२२
सकाळी ०६.४९ वा.



## (७९)
## रंगरंगुल्या भाव छटा

या रंगांच्या कोशी रंगल्या
रंगरंगुल्या भाव छटा
संमेलन जणू भरलेले की
रंग राणीच्या उडत्या बटा

तिचे हासणे रंगामधले
तिचे लाजणे रंगभरे
तिचे वागणे रंगडौलाचे
जगणे तिचे जणू रंग खरे

ती रंगांची जणु सम्राज्ञी
चित्रकाराची साधना
भाव बोलती मूक कुंचले
कलाकार आराधना

असे वाटते तिचे वस्त्र हे
गर्भरेशमी रंगांचे
सारे सारे मिसळून जाती
होत भूषणे अंगांचे

रंगभारल्या उषानिशाही
क्षितिजावरती ओघळती
रंग स्वर्गीचे रंग सुंदरसे
धरी अधरी उरी पाघळती

दि. ०८/११/२०२२
सकाळी १०.३९ वा.

## (८०)
## मी संगे नेईन सत्त्व रे

कधी कधी मला वाटते
काय चिरंतन येथले
संपणारे सारे सारे
लक्ष्य दूर ते तेथले

भेटती नाती नि गोती
क्षण क्षणांनी सांडती
श्वास आपुले आपणची
कधी कधी रे कोंडती

कोण आहे रे कुणाचे
तरीही सारे माझे हे
मोहधागे गुंतलेले
वाटते माझेच हे

सोडताना सोडणे ते
सारे सारे येथले
काय येईल संगतीने
देहही निपचित पडे

मी जगावे एकट्याने
जाणता हे तत्त्व रे
आसू हसतील त्या दिनी
मी संगे नेईन सत्त्व रे
मी संगे नेईन सत्त्व रे

दि. ०८/११/२०२२
सकाळी १०.५८ वा.



## (८१)
## आईपण मी भोगावे

चोच उघडून देती साद
पिल्लं माऊलीला
जीव आईचा तुटतो
दाणा भरविण्या त्याना

नाही शब्द मुखी नाही,
काही घरदार तरी
कसे कळते मनीचे
गुज अलगुज उरी

भूक लागते पिलांना,
हिंड हिंडते पक्षीण
सांभाळून चारा आणे,
जीवापाड जपे क्षण

उघडल्या चोचीमध्ये,
वात्सल्याचे दान पडे
दाणा दाणा अंगी लागे,
दिसामासी पिल्लू वाढे

किती करते तयारी,
तिच्या पिल्लांसाठी माय
देवाजीलाही ना कळे,
रसायन माय काय

पाहताना तिचे रूप,
वाटे त्यालाही अप्रूप
कुठे राम कुठे कान्हा,
घेत येतो तो स्वरूप

भूक भागते दत्ताची,
अनसूया पान्हा देई
थेंब रक्ताचा बोलतो,
अंतकाळी आई आई

काय मागू देवा तुला,
मला आईपण द्यावे
सारे सुख एक बाजू,
आईपण मी भोगावे
आईपण मी भोगावे

दि. ०८/११/२०२२
दुपारी १२.१० वा.



## (८२)
## कसे सांगू रे धुक्या सख्या

धुंद धुंदला मोही प्रवास
कप चहाचा पसरे सुवास
हाती हात प्रिये तुझा असा
सत्य भास की भास आभास

हिरव्या हिरव्या पल्लवराण्या
नव स्वप्नांनी खुणावती
एक कल्पना स्पष्ट होतसे
अन्य सुखाने दुणावती

धुक्यात तू ती उभी शहारून
ये राणी तू कवेत ये
मिठी रेशमी तलम मोगरी
अत्तर विरते हवेत जे

दवबिंदूंची गळ्यात माळ नि
तनुवर फुलतील प्राजक्त
तू मी, मी तू जन्मोजन्मी
परस्परात ग आसक्त

कसे सांगू रे धुक्या सख्या मज
क्षण सुंदर तू करिशी बहाल
तुझ्यामुळे मी प्रियतमकोशी
भ्रमरासम बंदिस्त कमाल

दि. १०/११/२०२२
सकाळी ११.३० वा.



## (८३)
## दाणा दाणा श्वास चालवी

ओंब्या गव्हाच्या हासऱ्या
वाऱ्यासवे कशा डोलती
आत भरते सत्त्व कोण नि
कोणा ओठी चालती

जीव जन्मा येती अगणित
सोय बघतो कोण त्यांची
किती मुखांची भूक शमवित
दाणे गणती कोण त्यांची

ही बहारच वेगळी जी
जगविण्यासाठी जगे
अन्न हेचि ब्रह्म मानून
रूप सुंदर जागवे

कोण भरतो पोषणाचे
रंग त्यातून आगळे
की स्वयं तो त्यात बैसून
पोसवितो सगळे

दाणा दाणा श्वास चालवी
श्वासासाठी सस्य दे
भूक पोटी पोट भरता
ओठी ओठी हास्य दे

साधना आराधना ही
रोज त्याची चालते
बीज रुजुनी कोंब येतो
जीवसृष्टी बोलते

दि. १५/११/२०२२
सकाळी ०७.४३ वा.



## (८४)
## रोज पथिक मी नवा नवा

कंच हिरवाईमधल्या गावी
श्वास मोकळे घ्यावे
डोंगरराजी त्या वनरागी
सारे साठवून घ्यावे

हिरव्या दुलयीत गुडुप नगांनी
धुकं चादर पांघरली
पायाखाली रेशीम हिरवी
मऊशार अंथरली

घरे उजळली उजळल्या दिशा
उन्हेही उजळून गेली
क्षणात मरगळलेल्या जीवनी
एक प्रेरणा आली

निसर्ग घर की घरी निसर्ग हा
सुंदर प्रश्न पडावा
रोज दिवस इथला मनमोही
रोज सुकाळ घडावा

कधी न संपो इथला वास अन्
सुवास परिसरी यावा
रोज पथिक मी नवा नवा
अन नवा प्रवासही व्हावा

दि. २०/११/२०२२
रात्री ०८.०२ वा.



## (८५)
## चोचीतले गाणे गाई

चिमणचोचीतून झेलू या चल
ओघळणारा दवबिंदू
पानावरल्या हिरवाईला
अलगद घेऊ चल चुंबु

उन्हे कोवळी अंगावरती
सोने सांडून जाताना
घरट्या बाहेर नका पडू बरे
आई सांगून जाताना

इथेच थांबू सोबत सोबत
सुंदर मोती दव सांडे
चोचीमध्ये मोती चारा
घालीन ऐसे आई सांगे

गोड गोड हे थंड थंडुले
कसे लागतील चव पाहू
थोडे पिऊ या थोडे झेलून
अंगावरती चल न्हाऊ

दवही पिल्लू या पानांचे
सोडत नाही त्या आई
मैत्री करूया झिम्मा खेळू
चोचीतले गाणे गाई

दि. २२/११/२०२२
सकाळी १०.०१ वा.



## (८६)
## पैलतीरावर गर्दी नाही

निळ्याशार जलपटलावरती
हंस एक हंसी ही विहरती
डौल वेगळा रंगही ढवळा
तरंग हलके हलके पसरती

विश्वतीरावर गजबज सारी
गाव वसलेले गर्दी भारी
इथे दोन हे पक्षी निवांत
मग्न होऊनी जलविहारी

जमेल का हे असेच आम्हा
गर्दीतून एकांत शोधण्या
स्वतःमध्ये गढून जाऊन
भावतरंग अलवार सोडण्या

रूप देखणे तनु रेखीव
मान वळीव किती आखीव
नेत्र मिटुनिया जपणे कोऽहम्
उत्तर मिळते सोऽहम् सोऽहम्

जीव हंस वरवरचा न शुद्ध
आत आत्मरंगही हो प्रबुद्ध
संसारातील सरोवराच्या
लाटांमधले सारून युद्ध

एक जीव एक आत्मा जोडी
भोग भोगण्या उपजत गोडी
तरीही होऊनी खरे शहाणे
बंधन ऐलतीराचे तोडी

रूप देह तो हंस देख तू
कर्मलिप्तता हंसी मागून
जल संसारी बिंब दाखवी
बुडू नको रे जीवा त्यातून

पैलतीरावर गर्दी नाही
शांत सरोवर निवांत पाही
मग स्थिरावी चित्ता आपुल्या
तत्त्व जीवाचे जाणून काही

दि. २४/११/२०२२
सकाळी ०७.४९ वा.



## (८७)
## मैतरीण भरतीया जीवाची पोकळी

असू दे भार काम
क्षण तू दोन थांब
सांग मनातलं
सखी सुखाचं पान

रांध रांधून बेजार
किती राबतीया नार
त्यात पाण्याचं संकट
दमछाक व्हती फार

घरदाराच्या सुखाला
सखी सांभाळू आपण
कोण सांभाळंल सांग
माझं मऊशार मन

दिसं उजडण्या आधी
उघडतीया पापणी
घर गुरढोर काम
रानातली ग कापणी

मानसासनी काय पाहिजे
समदं ध्यानात ठेवणं
कुणी ऐकल का बाई
दुखण्या खुपण्याचं गाणं

जरा भडभड बोलून
व्हते मी मोकळी
मैतरीण भरतीया
जीवाची पोकळी

दि. २४/११/२०२२
रात्री ०९.५४ वा.




## (८८)
## रोज सांजेला गगनी चाले

अहा अहा हे जळात केशर
नभी निळाई भाळून गेली
सांजतीरावर डुबतानाही
सुंदर किमया रवीने केली

लाटांनी हो गिरक्या घेऊन
एक रांगोळी पाणी काढली
नीरामध्ये रंग तरंगे
क्षितिजाचीही शोभा वाढली

मग उभे जे झाड सरळ ते
प्रतिबिंबाने अवचित झुकले
कुणा चित्रकाराची तबकडी
रंग मिसळुनी रंगच हुकले

पैलतीरावर काळी झाडी
गुडुप होईल क्षणात सारी
भरभर नेसून चंद्रकळा मग
खुलून जाईल निशा ही प्यारी

रोज सांजेला गगनी चाले
उत्सव सुंदर रंग सुन्यारा
वर जो बसला गाली हसला
उघडून देतो रम्य पिटारा

दि. ०१/१२/२०२२
सकाळी ०८.२३ वा.



## (८९)
## हरवला आज कुठेतरी गाव...

हरवला आज कुठेतरी गाव
मातीमधली नाती आणिक
घर कौलारू गोकुळ नाव
हरवला आज कुठेतरी गाव...

किती एकोपा होता तेथे
रुते काटा तर विव्हळ येथे
माणुसकी पुढे रंक न राव
हरवला आज कुठेतरी गाव...

झाडाभवती पार गजबजे
चौकाचौकातून बोल ते
उरी न सलतसे कुठला घाव
हरवला आज कुठेतरी गाव...

अंगणी जाईजुई उमलुनी
परसातून किती वेली फुलुनी
घ्यायच्या काळीज ठाव
हरवला आज कुठेतरी गाव...

कौलाराच्या मंद्र फटीतून
रोज डोकवीत कवडसा आतून
गवसतसे एक सुखाचा डाव
हरवला आज कुठेतरी गाव...

ती प्रेमाची साधी माणसे
पैका नव्हता नव्हती साधने
समाधान तरी केवढे पाव
हरवला आज कुठेतरी गाव...

तृप्तीचा दे भाकर तुकडा
पायी असू दे मायेचा सडा
मातीत राहून मातीच नाव
पुन्हा गवसु दे माझा गाव
नको हरवणे कुठेच गाव...

दि. ०२/१२/२०२२
सकाळी ०७.११ वा.



## (९०)
## पाचू सुरावळ उमटून जावी

हिरवाईची हिरवी नक्षी
हिरवी फांदी हिरवा पक्षी
हिरव्या पानापानातुनही
हिरवी बरवी सृष्टी साक्षी

हिरव्या हिरव्या गवतामध्ये
हिरवी दुलई लपून बसते
हिरव्या स्पर्शातील साजणा
रोमांचित हरिताली हसते

हिरव्या नदीचे हिरवे वाहणे
हिरव्या प्रतिबिंबास पाहणे
हिरव्या राणीच्या लज्जेसाठी
हिरवाईच्या डोही गाहणे

हिरवा गारवा भिरभिर फिरतो
मरगळ थकवा काहीच नुरतो
हिरवी स्वप्ने नीजही हिरवी
हिरवा मरवा श्वासी उरतो

म्हणून वाटते घडून यावी
हिरवी भ्रमंती हिरव्या गावी
एक मनाची तार छेडिता
पाचू सुरावळ उमटून जावी

दि. ०६/१२/२०२२
सकाळी ०८.३२ वा.



**(९१)**

**हृदय केवढे श्रीमंत**

पोट खपाटी शरीर काठी
गरिबीचे जगणे
अन्न असो की पाणी साधे
क्षणक्षण झगडणे

घर कुणाचे जाय बांधले
श्रम कुणाचे तिथे सांधले
विटा विटा त्या भिजुनी घामी
चिरे चिरे अवजड की थांबले

पोर गरिबीत पिचले आहे
राबराबुनी थकले आहे
पाण्यासाठी घेत बादली
उभ्या उभ्या जणू निजले आहे

मला वाटते पाहून स्वप्नं
महाल त्याचा होई झटकन
तिथे साहेबी थाट आपुला
पाहून गाली हसेल खुदकन

दिमतीला ते नोकरचाकर
बाळही झाला राजसुकुमर
उंची वस्त्रे वाहन सुंदर
तेज मुखावर पसरे खरोखर

ताटी पंच पक्वान्ने आणिक
पायी महागडे जोडे
शान ऐट ती अनुभवूनी
स्वप्नी रमेल थोडे

क्षणात येऊन भानावर मग
सत्य जे चमके लख्ख पुढे
आस तरी जी निश्चित पक्की
उगाच का मग कोण कुढे

रोमरोमातून हाक ऐकू ये
बदल परिस्थिती ना खंत
या गरिबीची ऐशीतैशी
हृदय केवढे श्रीमंत

दि. ०८/१२/२०२२
सकाळी ०७.१३ वा.

## (९२)
## अवघड ना जीवनाची वाट

नदी वाहते प्रवाह अवखळ
कधी वळणांचा थाट
अवघड ना जीवनाची वाट

रम्य भासू दे पांथासाठी
निवांत थोडा काठ
अवघड ना जीवनाची वाट

दुःख गिळून घे नकळत सारे
दिसो सुखाचे पाट
अवघड ना जीवनाची वाट

अश्रू ढळले ढळू दे एकटे
जनी हास्याची लाट
अवघड ना जीवनाची वाट

क्षणोक्षणी नवं चैतन्याची
उगवत राहो पहाट
अवघड ना जीवनाची वाट

ऋतू झेलावे वेगवेगळे
मान असावी ताठ
अवघड ना जीवनाची वाट

संभ्रमित तो व्हावा यमही
उतरून जाईल घाट
अवघड ना जीवनाची वाट

दि. ०८/१२/२०२२
सकाळी १०.१६ वा.



## (९३)
## जीव जडविणे व्यर्थ

कधी नात्यांचा पाश भोवती
कधी नात्यांचा फास
नाती कसली ना ती आपुली
तरी नात्यांचा ध्यास

जन्म वायफळ नात्यांसाठी
ना त्यातून कधी मुक्ती
नाही त्यांच्या मुळे शांतता
कसली ना चाले युक्ती

कशास उगवे चंद्र तरीही
शाप जरी त्या भाळी
विलोप होणे आणि ग्रासणे
डाग जरी त्या कपाळी

एक अनामिक ओझे वाहून
दमतो जीव बिचारा
बळी नात्यांचा उगा फुकाचा
वाहून उगा पसारा

आंदण मिळतो एकटेपणा
गर्दीतून नात्यांच्या
खुंट्यापाशी अडकून भरडती
दाणे पुन्हा जात्याच्या

येईल का कधी विमुक्त होणे
मनापासुनी त्यातून
कशास गहिरा खड्डा पडतो
विचारांनी हो आतून

ना ती माझी ना त्या वरती
जीव जडविणे व्यर्थ
नाती कसली नात्या साठी
जीव जाळण्या अर्थ?

दि. १६/१२/२०२२
पहाटे ०४.०३ वा.



## (९४)
## धाम साऱ्यांचे शेवटी

मी कुठे? कोण मी?
सृष्टीच्या पसाऱ्यातील, कण मी

त्या जळातील थेंब माझे अस्तित्व
त्या नभातील मेघकण माझे तत्त्व

अग्नी निवसे देही माझ्या मी जगे
मृण्मयी मी मृत्तिकेची ना वावगे

श्वास माझे पंचप्राणी ओतले
पंचतत्त्वांनी जवळ मज घेतले

एकटी ना मी कधी सारे सोबती
जन्म सुंदर गात्र सक्षम वागती

सृष्टी सारी माय वाटे गगन बाप
अणुरेणू ब्रह्मांड सारे अमाप माप

याही पल्याड जो बसला आहे तेथे
धाम साऱ्यांचे शेवटी नित्य जेथे

हृदय कर मी जोडते त्या अंजली
भावभक्तीची फुले सुख ओंजळी

दि. १८/१२/२०२२
सकाळी ०७.४७ वा.



## (९५)

**एक साधं झाड कधी होऊ देत**

बहर पालवीचे नेहमीच
सुखावणारे असतात
काही पल्लव्या
फुला फळांनी मातृत्व मिरवतात
तर काही नुसत्याच
आपल्याच स्वरूपात रममाण होणाऱ्या
असतात

त्यांना नाही म्हणत कोणी वांझ
निफळीक निपुष्पीक वगैरे वगैरे

खरं तर त्यांच्या गावीही नसते असे काही
दुस्वासाचे विचार गाठोडे
त्यांना नवीनतेने नेहमीच स्वतःला
सजवायला धजवायला आवडते
झाडाला पानांनी डवरायला आवडते

पान गळती येते तेव्हा पिवळे पिवळे
आसवं ढाळतंच की ते झाड
किती तरी अगणित
पण पुन्हा तेवढ्याच किंबहुना
त्याहूनही अधिक अंकुरांनी
लेकुरवाळं होऊन जातं ते झाड

अस्तित्त्व तेव्हाच संपतं जेव्हा
आपणच आपला दुस्वास करू लागतो
काय नाही हे पाहत बसतो
अन्
काय आहे हे मात्र लक्षातच घेत नाही

एवढी पालवी फुटूनही
जगण्याला भुंड समजत रडत राहतो
वेड्यागत
शिकावं नाही असं थोडं
उगाच अशा आपल्याच मस्तीत
हिरव्यागार राहणाऱ्या झाडाकडून !

बहर आपलेच, जाणिवा आपल्याच
मानणं आपलंच
उणिवा झडू देत, भ्रम सारे पडू देत
देवा मला एक साधं झाड कधी होऊ
देत...

दि. २१/१२/२०२२
सकाळी ०५.५४ वा.

# लेखिकेचा परिचय


- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**

  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक - संस्कृत)

  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर - ४०० ००५

  ई-मेल : dr.manjushak@gmail.com

  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४


**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली. (https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२० प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित ''वैदिक साहित्याचा इतिहास'' (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा :** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

‘‘**साहित्यिक व्रत**’’ म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील ‘हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’ मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक ‘विवाह संस्कार’ २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्याय:, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर ‘प्राचीन भारतीय समाज’, ‘सूर्य शक्ती और मानव’, ‘कौटिलीय अर्थशास्त्र’, ‘स्मृतीग्रंथ – भाग १ और २’ ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा - नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), बकुळफुले (फुलांवरील कविता), मृद्‌गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी-जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड-गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग-निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा (निसर्गावरील कविता), नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश (देवभक्तीपर), मंगेश, आंदण (प्रासंगिक), रूप-स्वरूप (राधाकृष्ण), अलवार, मधुश्री (ऋतू), सुधांशु (चंद्र), दिव्यांतरी (सूर्य), अळुमाळु (फुले), सुरभी (फुले), खाणाखुणा (पशु), वैष्णवी (पक्षी), नादश्रुती, श्वेता (तिच्यावरील प्रीत कविता), स्वामिनी (स्त्रीजीवन - भाग १), मृणालिनी (स्त्रीजीवन - भाग २), प्रमिला (धरती-आकाश), लाघव वेळा (सकाळ-संध्याकाळ), मनमंदिरा, तेजशलाका, उदय, मंजुभारती (जीवनपर कविता) यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग-१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात - डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये 'मंजु मंजिरी' आणि 'सर्ग निसर्ग' नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके -**

(राधाकृष्ण) - श्रीरंग, कृष्णकांत, (निसर्गपर) - सृष्टीगंध, (वेळा) - तेव्हा, (त्याच्यावरील प्रीत कविता) - प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर, (मिश्र कविता) - गंधराणी, हृदयस्पर्शी, कवडसा, मृण्मयी, अबोली, (ऋतू) - सहा सोहळे, नभ मोजताना, (पाऊस कविता) - श्रावणी, (गझल) - उल्का, (रसिकप्रतिक्रिया-कवीश्वर) - बोल बरवे, (अन्य रसिक प्रतिक्रिया) - प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (वाट) - जरा रेंगाळले, (Audio - Book) - युगंधरा, कामिनी, (रंग) - रंगतनु, (गझल) - मनस्विनी, (सर्वोत्कृष्ट कविता) - माझी कविता, (ललितलेख) - मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२–२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान – २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार – २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर – ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१
- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार २०१९
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८

- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री<br>मुलाखत,<br>दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source =whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialshare buttons |
| ३ | ‘‘आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे.’’ साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/maha_governor/status/ @maha_governor 1439559856764030979 ?s=08 <https://twitter.com/maha_governor/status/1439559859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान 'प्रकाशवाटा' या डॉ. प्रकाश आमटे यांच्या आत्मचरित्राचा संस्कृत अनुवाद डॉ. कुलकर्णी यांनी 'प्रकाशमार्गा:' | https://www.loksatta.com //lokrang/sahitya-akademi-award-for-translation-autobiography-of-prakash-amte-poet-prof-dr-manjusha-kulkarni-prakashwata-zws-70-2612674/lite/ ?utmsource=whatsapp_web&utm_medium=social&utm_campaign=socialsharebuttons |
| ७ | https://mr.wikipedia.org | https://mr.wikipedia.org/wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी यांचा महाराष्ट्र राज्याच्या मा. राज्यपालांच्या हस्ते अभिनव साहित्यिक विक्रम केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com MahaGovtMic/status 1476551366352924672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार 'साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला' भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/InfoVidarbha/status/1418559733921816580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर डॉ. मंजूषा कुलकर्णी सखी सह्याद्री - डीडी सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/ITLxInwuJc ; https:/youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह डॉ.मंजूषा कुलकर्णी / नवरात्री स्पेशल / सकाळ मीडिया | https://youtu.be/m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=126653350529198id=100015176343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=4429100480484776 id=100001546044035 sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम – ''सर्ग_निसर्ग'' ऑडिओ अल्बम – ''मंजुमंजिरी'' | <https://vy6s8.app.goo.gl/NKnJ> https://vy6s8.app.goo.gl/A8Z5 |
| १८ | Special Screening of 100th Episode of Mann Ki Baat from Raj Bhavan | https://www.youtube.com/live/7-dyWQaLA?si=mid7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग – १ | https://youtu.be/TrNMBV_ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग –२ | https://youtu.be/NpvMk-Pu4dOs?si=typfHtOvNg-1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : ७२
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : ३१
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

● ● ●